दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : २६७ • पुणे • गुरुवार, दि. १८ जून २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

# सत्ताधारी- विरोधकांमध्ये सभागृहात राडा

## पाणीटंचाईवरील चर्चा अर्धवट : पुणेकरांच्या पाण्याच्या प्रश्नावरून महापालिकेत गोंधळ; ६० लाख नागरिकांच्या अपेक्षांवर पाणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरात दिवसाआड पाणीपुरवठा, गढूळ पाणी आणि तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिक त्रस्त असताना पुणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत बुधवारी पाणी प्रश्नावर जोरदार चर्चा सुरू होती. मात्र या चर्चेला अचानक राजकीय वळण लागल्याने सभागृहात मोठा गोंधळ उडाला. सत्ताधारी भाजप आणि विरोधी पक्षांच्या नगरसेवकांमध्ये झालेल्या शाब्दिक चकमकीनंतर वातावरण तापले आणि अखेर सभा तहकूब करण्यात आली. परिणामी, तब्बल ६० लाख पुणेकरांच्या जिव्हाळ्याच्या पाणीप्रश्नावर प्रशासनाकडून अपेक्षित खुलासा होऊ शकला नाही.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने महापालिकेने १५ जूनपासून एक दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय लागू केला आहे. मात्र या निर्णयानंतर अनेक भागांत नागरिकांना निर्धारित वेळेत पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही ठिकाणी अवघ्या अर्धा तासासाठी पाणी येत असून अनेक भागांत गढूळ



पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते निलेश निकम यांनी सर्वसाधारण सभेत पाणीटंचाईचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर विविध पक्षांच्या नगरसेवकांनी आपल्या प्रभागांतील परिस्थिती मांडत प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पाणीपुरवठ्याचे नियोजन, टँकर व्यवस्थापन, गळती नियंत्रण आणि नागरिकांच्या तक्रारींवरील प्रतिसाद याबाबत प्रशासनाला जाब विचारला जात होता. दरम्यान, कोंढवा येथील नगरसेवक गफूर पठाण हे आपल्या भाषणात परिसरातील पाणीटंचाईची समस्या मांडत असताना त्यांनी बोपोडी येथील दर्ग्यावर झालेल्या कारवाईचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. यानंतर सभागृहातील वातावरण अचानक तापले. पाणीप्रश्नावरच चर्चा करावी, अशी मागणी करत भाजपच्या काही नगरसेवकांनी पठाण यांच्या आसनाकडे धाव घेतल्याचा आरोप विरोधकांनी केला. यावेळी पठाण यांनी हातात तिरंगा झेंडा घेत संविधानाने मला माझे मत मांडण्याचा अधिकार दिला असल्याचे सांगत आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचवेळी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या नगरसेवकांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक झाली. काही नगरसेवक आक्रमक झाल्याने सभागृहात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. विरोधी पक्षातील सदस्यांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. घटनेनंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नगरसेवकांनी महापौर मंजूषा नागपुरे यांच्याकडे तक्रार नोंदवत सभागृहात विरोधी सदस्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. सभागृहात अशा प्रकारची दादागिरी सहन केली जाणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली. गोंधळाच्या पार्श्वभूमीवर सभागृहनेते गणेश बिडकर यांनी सभा तहकूब करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर सुरू असलेली पाणीटंचाईवरील चर्चा अर्धवट ठेवून सभा तहकूब करण्यात आली. विशेष म्हणजे, त्यावेळी अजून अनेक नगरसेवकांना बोलायचे होते आणि प्रशासनाकडून पाणीस्थितीवर सविस्तर खुलासा अपेक्षित होता. त्यामुळे नागरिकांच्या प्रश्नांवर ठोस चर्चा होण्याची संधी हुकली.

सभागृह तहकूब झाल्यानंतर विरोधी पक्षांच्या गटनेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत घटनेचा निषेध नोंदविला. पुणे महापालिकेच्या सभागृहाला लोकशाही परंपरेचा मोठा वारसा असून महात्मा फुले यांच्यासह अनेक दिग्गजांनी येथे लोकहिताचे प्रश्न मांडले आहेत. अशा सभागृहात विरोधी मत दडपण्याचा प्रयत्न होणे दुर्दैवी असल्याचे त्यांनी सांगितले.

महिला नगरसेविकांमध्येही या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचा दावा विरोधकांनी केला. या प्रकाराच्या निषेधार्थ गुरुवारी (ता. १८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर सर्व विरोधी पक्षांच्या नगरसेवकांतर्फे आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. तसेच पुढील सर्वसाधारण सभेत बोपोडी दर्गा प्रकरणासह अन्य विषयांवर चर्चा करण्याची मागणीही करण्यात आली.

> महापौर मंजूषा नागपुरे यांनी घडलेल्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त केला. "महापालिकेच्या सभागृहात जे घडले ते योग्य नाही. सर्व नगरसेवकांनी शिस्त आणि संयम राखणे आवश्यक आहे. एखाद्या सदस्याचे मत पटत नसल्यास त्याला लोकशाही पद्धतीने विरोध करावा. आज पाणीटंचाईच्या प्रश्नावर आयुक्तांकडून महत्त्वाचा खुलासा होणार होता. तो पुणेकरांसाठी आवश्यक होता. तो होऊ शकला नाही, याचे वाईट वाटते," असे त्यांनी सांगितले.

## ठळक बातम्या

### फराटे पाटील महाविद्यालयास दंड

मांडवगण फराटा (आरंभ पर्व) : मांडवगण फराटा येथील फराटे पाटील आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयावर भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाने (NCISM) तब्बल एक कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. महाविद्यालयाने मान्यता मिळविण्यासाठी अशैक्षणिक व रुग्णालयीन कर्मचारी केवळ कागदोपत्री दाखवून खोटी व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याचा ठपका आयोगाने ठेवला आहे. आयुष मंत्रालयाच्या अधिपत्याखालील मेडिकल असेसमेंट अँड रेटिंग बोर्डाने हा आदेश जारी केला. सार्वजनिक तक्रार निवारण पोर्टलवर दाखल झालेल्या तक्रारीच्या चौकशीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. चौकशीदरम्यान महाविद्यालयाने दाखविलेले अनेक कर्मचारी प्रत्यक्षात त्याच ट्रस्टच्या इतर महाविद्यालये, शाळा आणि संस्थांमध्ये प्राध्यापक, विभागप्रमुख, प्राचार्य किंवा इतर पदांवर कार्यरत असल्याचे उघड झाले.

### पुणे-शिर्डी दररोज धावणार एक्स्प्रेस

पुणे (आरंभ पर्व) : पुणे आणि शिर्डीदरम्यान दररोज धावणारी नवीन रेल्वे बुधवारपासून सुरू झाली आहे. गाडी क्रमांक ११४२३ पुणे-साईनगर शिर्डी एक्स्प्रेस पुणे स्थानकावरून सकाळी ६.५५ वाजता सुटून दौंड, श्रीगोंदा, अहिल्यानगर, राहुरी आणि बेलापूरमार्गे दुपारी १२ वाजता शिर्डी येथे पोहोचेल. परतीची ११४२४ साईनगर शिर्डी-पुणे एक्स्प्रेस शिर्डीहून सायंकाळी ६.१० वाजता सुटून बेलापूर, राहुरी, अहिल्यानगर, श्रीगोंदा रस्ता आणि दौंड स्थानकांवर थांबे घेत रात्री ११.५५ वाजता पुण्यात येईल, अशी माहिती रेल्वे बोर्डाचे निदेशक संजय नीलम यांनी दिली.

### वीर धरणात केवळ १८ टक्के साठा

परिंचे (आरंभ पर्व) : वीर (ता. पुरंदर) धरणाच्या पाणीपातळीत मोठ्या प्रमाणात घट झाली असून, बुधवारी (ता. १७) घेतलेल्या आकडेवारीनुसार धरणात केवळ १.७ टीएमसी (१८ टक्के) पाणी साठा शिल्लक आहे. पावसाने आणखी ओढ दिल्यास धरणाच्या आतमध्ये असलेले जुने ब्रिटिशकालीन वीर धरण उघडे पडण्याची शक्यता आहे. वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या वर्षी १५ मेदरम्यान पावसाला सुरुवात झाली होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा नीरा खोऱ्यातील धरणांची पाणी पातळी अत्यंत खालावलेली आहे. माउलींच्या पालखी सोहळ्यासाठी वीर धरणाच्या दोन्ही कालव्यातून पाण्याचा विसर्ग करावा लागतो. तसेच, पुणे जिल्ह्यातील सासवड व सातारा जिल्ह्यातील लोणंद शहरांना पाणीपुरवठा योजना सुरू असून, अनेक गावच्या पेयजल योजना अवलंबून आहेत. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अनेक छोटे जलाशय असून, त्यांचाही पाणी साठा संपुष्टात आला आहे. धरणातून पुणे, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील ६५ हजार हेक्टर क्षेत्राला शेतीसाठी पाणीपुरवठा केला जातो.

## विद्यार्थ्यांनी संशोधक वृत्ती जोपासत तंत्रज्ञानातील बदल आत्मसात करावेत : डॉ. पी. के. सिन्हा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"मानवी भवताल वेगाने बदलत असून, तंत्रज्ञानातील बदलांची गती सर्वाधिक आहे. आपल्याला २०४७ पर्यंत विकसित श्रेणीत पोहोचण्यासाठी युवा पिढीला नव्या काळानुरूप स्वतःमध्ये आणि भवतालामध्ये अनुरूप परिवर्तन घडवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी तरुणांनी संशोधक वृत्ती जोपासत झपाट्याने बदलणारे तंत्रज्ञान अवगत करावे," असे प्रतिपादन इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी) रायपूरचे माजी कुलगुरू व संचालक डॉ. पी. के. सिन्हा यांनी केले. भारत विश्वगुरू होण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतही पूरक बदल आवश्यक असून, त्यासाठी 'इग्नाईट २०२६' यांसारख्या तांत्रिक परिषदांमधून पाठबळ मिळेल, असेही ते म्हणाले. येवलेवाडी येथील केजे एज्युकेशनल इन्स्टिट्यूट्स संचालित केजे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट रिसर्चतर्फे इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर्स (आयईईई) पुणे विभाग, यांच्या तांत्रिक सहकार्याने आयोजित इनोव्हेशन अँड ग्रोथ इन नेक्स्ट-जन इंटेलिजंट टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग (इग्नाईट) २०२६ या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनावेळी डॉ. सिन्हा बोलत होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या नूतनीकरण, सभागृह होणार

### स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठकीमध्ये झाला निर्णय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील मौजे कोपरे गावातील भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक पुतळ्यास एप्रिल २०२७ मध्ये ५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर सुवर्णमहोत्सव वर्षाचे औचित्य साधून पुतळ्याचे नूतनीकरण तसेच भव्य सभागृह उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या संदर्भात पुणे महानगरपालिकेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत पुतळ्याचे जतन व संवर्धन, परिसराचे सुशोभीकरण, नागरिकांसाठी आवश्यक सुविधा तसेच नवीन भव्य-दिव्य सभागृह उभारणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष मा. श्रीनाथजी भिमाले



यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक नगरसेवक सुभाषभाऊ नाणेकर यांच्या पुढाकारातून निधीतून विकासकामे प्रस्तावित करण्यात आली.

स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी ह्या कामासाठी भरीव निधीची ग्वाही दिली. व अधिकाऱ्यांना यासंबंधी पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले. यावेळी अधीक्षक अभियंता बिपिन शिंदे, कार्यकारी अभियंता मंदार धायगुडे, उपअभियंता गणेश कांबळे, कनिष्ठ अभियंता राजेश्वरी मुरादे तसेच स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हा एकमेव अर्धपुतळा असल्याने त्याला विशेष ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे सुवर्णमहोत्सव वर्षानिमित्त या स्मारकाचे वैभव वाढविण्यासाठी आणि भाविक व नागरिकांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही विकासकामे हाती घेण्यात येत आहेत.

> "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि या ऐतिहासिक स्मारकाचे जतन करण्यासाठी सुवर्णमहोत्सवानिमित्त पुतळ्याचे नूतनीकरण व भव्य सभागृह उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे. ही कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."
> **- सुभाषभाऊ नाणेकर, स्थानिक नगरसेवक, पुणे मनपा**

# पुण्यात तीव्र पाणीटंचाई

- काँग्रेसचे महापालिकेत हंडा आंदोलन
- दिवसाआड पाणीपुरवठा, गढूळ पाणी आणि नियोजनाच्या अभावावरून प्रशासनाला धारेवर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आज पुणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत काँग्रेस पक्षाने आक्रमक पवित्रा घेत हंडा आंदोलन केले. शहरातील अनेक भागांत दिवसाआड पाणीपुरवठा, कमी दाबाने पाणी येणे, गढूळ पाण्याचा पुरवठा तसेच अवेळी पाणी मिळत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेसच्या नगरसेवकांनी रिकाम्या घागरी आणि निषेधाचे फलक हातात घेऊन महापौरांच्या आसनासमोर आंदोलन केले.

काँग्रेसचे गटनेते रामचंद्र कदम यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात नगरसेवकांनी प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरात सुरू असलेल्या दिवसाआड पाणीपुरवठ्यामुळे अनेक भागांत नागरिकांना अवघा अर्धा तासही पाणी



मिळत नसल्याची तक्रार करण्यात आली. त्याचबरोबर गढूळ पाणीपुरवठा आणि अनियमित वेळेमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

महापौर मंजूषा नागपुरे यांनी आंदोलनकर्त्यांची भूमिका ऐकून घेत पाणीटंचाईच्या विषयावर सभागृहात सर्व नगरसेवकांना सविस्तरपणे बोलण्याची संधी दिली जाईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर काँग्रेसने आपले आंदोलन मागे घेतले. मात्र शहरातील पाणी प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी कायम ठेवण्यात आली.

दरम्यान, सभागृहात पाणी प्रश्नावर चर्चा सुरू असताना सभागृहनेते गणेश बिडकर यांनी केवळ प्रशासनावर टीका करण्याऐवजी सर्व पक्षांनी उपाययोजना सुचवून सहकार्य करावे, असे आवाहन केले. सध्या शहरासमोर गंभीर पाणीटंचाईचे संकट उभे असून या परिस्थितीत सर्वांना एकत्रितपणे काम करावे लागेल, असे त्यांनी नमूद केले.

यावर काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी जोरदार प्रतिवाद करत प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन झाले नाही, याला जबाबदार कोण? नागरिकांच्या तक्रारींना अधिकारी प्रतिसाद देत नाहीत, फोन उचलत नाहीत, याची जबाबदारी कोणाची?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. प्रशासनाला जाब विचारण्याऐवजी त्यांची बाजू घेतली जात असल्याची टीकाही त्यांनी केली.

"जोपर्यंत नागरिकांना नियमित आणि पुरेसे पाणी मिळत नाही, तोपर्यंत आम्ही हा प्रश्न लावून धरू," असा इशारा देतानाच शिंदे यांनी सभागृहनेत्यांवरही उपरोधिक टीका केली. "सभागृहनेत्यांचा खुलासा ऐकून महापालिकेला चौथे अतिरिक्त आयुक्त मिळाले आहेत की काय, असे वाटते," असा टोला त्यांनी लगावला.

> पाणीटंचाईच्या प्रश्नावरून सभागृहात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलीच खडाजंगी पाहायला मिळाली. शहरातील नागरिकांना नियमित, स्वच्छ आणि पुरेसा पाणीपुरवठा कधी मिळणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

चर्चा तर होणारच
अभिषेक मरगळे




## कथित गैरप्रकारांविरोधात पालकांचे बेमुदत अन्नत्याग आंदोलन

- पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याचा आरोप
- उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दौंड तालुक्यातील विद्या प्रतिष्ठान संचालित अनंतराव पवार इंग्लिश मीडियम स्कूल, स्वामी चिंचोली येथील आरटीई (शिक्षणाचा अधिकार अधिनियम) अंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रियेमध्ये कथित गैरप्रकार व अनियमितता झाल्याचा आरोप करत अनेक पालकांनी जिल्हा परिषद, पुणे कार्यालयासमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. हे आंदोलन १५ जून २०२६ पासून सुरू असून न्याय मिळेपर्यंत ते सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलनकर्त्या पालकांनी व्यक्त केला आहे. आंदोलनकर्त्या पालकांच्या म्हणण्यानुसार, आरटीई प्रवेशाच्या पहिल्या लॉटरी यादीत त्यांच्या पाल्यांची नियमानुसार निवड झाली होती. आवश्यक कागदपत्रांची पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही काही स्थानिक दबाव व प्रभावाखाली संबंधित तालुका पडताळणी समितीने त्यांच्या अर्जांना पुन्हा अपात्र ठरविले. त्यामुळे पात्र आणि गरजू विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याचा गंभीर आरोप पालकांनी केला आहे. पालकांच्या आरोपानुसार, काही विद्यार्थ्यांना शाळेपासूनचे निर्धारित हवाई अंतर नियमांनुसार पात्रता नसतानाही प्रवेश देण्यात आला. तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या काही कुटुंबांनी कथितरीत्या चुकीची माहिती सादर करून उत्पन्न प्रमाणपत्रे मिळवली आणि आरटीई अंतर्गत प्रवेश मिळवला. यामुळे खऱ्या अर्थाने आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांचे हक्क डावलले गेल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

**थोडक्यात पण महत्वाचे**



## ओबीसी मोर्चाच्या संघटनात्मक निवडींना सुरुवात

- उपाध्यक्षपदी चार पदाधिकाऱ्यांची निवड

पुणे (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टी पुणे शहर कार्यालयात शनिवारी (दि. १३ जून २०२६) ओबीसी मोर्चाच्या संघटनात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष श्री विकास लवटे यांच्या नेतृत्वाखाली सरचिटणीस रमेशबापू गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये श्री सुमित बेनकर, श्री निलेश निर्मळे, श्री भगवान शिंदे आणि श्री गुलाब साळुंखे यांची ओबीसी मोर्चाच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. संघटन अधिक मजबूत करण्यासाठी तसेच ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या प्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, ओबीसी मोर्चाच्या सौ. शुभदा धामापूरकर, श्री यशोधन आखाडे, श्री मंगेश शहाणे, श्री दिनेश रासकर, श्री नंदकुमार गोसावी, श्री विनोद जालगी, श्री सूर्यकांत घनवट, श्री चारुदत्त शिंदे तसेच ओबीसी मोर्चाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांमुळे संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळेल, असा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.



## जुन्नरला डेंग्यू-चिकुनगुनिया विरोधात जनजागृतीची मोहीम

जुन्नर (आरंभ पर्व) : आरोग्य विभागाच्या वतीने पावसाळ्यात उद्भवणारे कीटकजन्य आजारांवर प्रतिबं धात्मक उपाययोजनेच्या हितवाप उपकार्यालाय, प्रशासकीय भवन येथे नुकतीच कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक,आरोग्य सहाय्यिका,आरोग्य सेवक, आरोग्य निरीक्षक, समुदाय आरोग्य अधिकारी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी उपस्थित होते. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी कुळमेथे यांनी पावसाळ्यात डेंग्यू, चिकुनगुनिया अशा कीटकजन्य आजारांवर प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून याबाबत कीटकशास्त्रीय सर्वेक्षण करून घ्यावे. प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकाऱ्यांनी संशयित रुग्णाचे रक्तजल नमुने वेळेत तपासणी करण्यासोबत कर्मचाऱ्यांशी समन्वय ठेवावे. आपल्या भागातील ग्रामपंचायत पदाधिकारी व परिसरातील शाळेतदेखील जनजागृती करावी. जुलै महिन्यात पालखी सोहळा असल्याने आतापासूनच परिसरातील विहीर, हातपंप शुद्धीकरण करण्याची मोहीम हाती घ्यावी असे डॉ.कुळमेथे यांनी सूचना दिल्या. आरोग्य पर्यवेक्षक सोनु गावडे यांनी नियमित कीटकशास्त्रीय सर्वेक्षणाबाबत माहिती दिली. आरोग्य निरीक्षक संतोष आटोळे व जयराम रावते यांनी डेंग्यू रुग्णांचा शोध व गप्पी मासेबाबत मार्गदर्शन केले.



## 'आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती' पुस्तकातून शाश्वत शेतीचा नवा मार्ग

पुणे (आरंभ पर्व) : नैसर्गिक शेती, विषमुक्त अन्ननिर्मिती आणि जलसंवर्धनाचा संदेश देणाऱ्या 'आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती' या पुस्तकाचे प्रकाशन वनराई संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात उत्साहात पार पडले. नैसर्गिक शेतीचे अभ्यासक, प्रयोगशील शेतकरी आणि समाजकल्याण विभागाचे सह आयुक्त प्रमोद जाधव लिखित या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमास वनराईचे विश्वस्त गिरीश गांधी, समाजकल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, कृषी प्रक्रिया व नियोजन-विस्तार विभागाचे कृषी संचालक विनयकुमार आवटे, कृषी-जैवविविधता तज्ज्ञ संजय पाटील, वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वैद्य विनायक परशुराम वैद्य खडीवाले, वनराईचे विश्वस्त सागर धारिया, सचिव अमित वाडेकर, लेखक प्रमोद जाधव उपस्थित होते.




## गुणवंत विद्यार्थ्यांचा बाकलीवाल ट्युटोरियल्सतर्फे गौरव


पुणे (आरंभ पर्व) : अभियांत्रिकी प्रवेशासाठीच्या संयुक्त प्रवेश परीक्षेची प्रगत पातळी, राष्ट्रीय विज्ञान स्पर्धा, होमी भाभा परीक्षा तसेच दहावी-बारावी मंडळ परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा बाकलीवाल ट्युटोरियल्सतर्फे आयोजित वार्षिक गौरव सोहळ्यात सन्मान करण्यात आला. गणेश कला क्रीडा मंच येथे झालेल्या या कार्यक्रमास सुमारे अडीच हजार विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यंदाच्या संयुक्त प्रवेश परीक्षेच्या प्रगत पातळीच्या निकालात संस्थेचे ४०८ विद्यार्थी पात्र ठरले असून, देशातील नामांकित तंत्रशिक्षण व विज्ञान संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्याच्या दिशेने त्यांनी वाटचाल सुरू केली आहे. या सोहळ्यात प्रगत पातळीच्या परीक्षेत देशपातळीवरील उल्लेखनीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, सुवर्ण व रौप्य नाणी तसेच स्मृतिचिन्हे देऊन गौरविण्यात आले. परीक्षेत पात्र ठरलेल्या इतर विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय विज्ञान स्पर्धा, होमी भाभा परीक्षेचे विविध टप्पे यामध्ये यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले. तसेच दहावीच्या मंडळ परीक्षेत ९९ टक्क्यांहून अधिक आणि बारावीच्या मंडळ परीक्षेत ९७ टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मंचावर गौरव करण्यात आला.

# संघटनात्मक बदलाने आगामी निवडणुकांमध्ये रंग भरणार

## खडकवासला विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) परिवर्तनाकडून यशाकडे झेपावेल?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने आगामी राजकीय समीकरणे लक्षात घेऊन संघटनात्मक बांधणीला वेग दिला असून विविध पदांवर नव्या नियुक्त्या करून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. या संघटनात्मक परिवर्तनाकडून यशाकडे झेप घेणार का.. याकडे सर्वांचे लक्ष लागणार आहे.



मात्र या बदलामुळे पक्षामध्ये चैतन्य पसरले आहे. आता कोणत्याही निवडणुका नाहीत मात्र खडकवासला विधानसभा मतदारसंघातील जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी आम्ही सज्ज असल्याचे नवीन पदाधिकाऱ्यांनी सांगितलं. पक्षाकडून करण्यात आलेल्या नव्या नियुक्त्यांमध्ये महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजपमधून राष्ट्रवादीत दाखल झालेले रुपेश घुले पाटील यांची शहर कार्यकारिणी उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर संदीपदादा मते यांच्याकडे खडकवासला विधानसभा अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच ॲड. सुधाकर गायकवाड यांच्याकडे ग्रामीण भागाच्या संघटनात्मक कामकाजाची धुरा देण्यात आली आहे.

युवा नेतृत्वालाही पक्षाने संधी देत अतुलआप्पा धावडे यांची खडकवासला विधानसभा युवा मोर्चा अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. त्यामुळे पक्षाने अनुभवी आणि युवा नेतृत्वाचा समन्वय साधत आगामी काळातील राजकीय लढतीसाठी तयारी सुरू केल्याचे स्पष्ट होत आहे.

सध्या कोणतीही मोठी निवडणूक नसतानाही राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने संघटनात्मक फेरबदल करून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची ही तयारी महत्त्वाची मानली जात आहे. लवकरच आणखी काही संघटनात्मक नियुक्त्या जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ३३ मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे सोपान उर्फ काका चव्हाण आणि अनिता इंगळे विजयी झाले होते. तर संदीप मते यांचा अवघ्या ५०० मतांनी पराभव झाला होता. रश्मी घुले पाटील यांनाही विजय मिळवता आला नसला तरी त्यांनी घेतलेली मतसंख्या लक्षणीय मानली गेली होती. त्यामुळे प्रभाग ३३मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला अनुकूल वातावरण आहे.

प्रभाग क्रमांक ३४ मध्ये पक्षाच्या उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला असला तरी स्थानिक पातळीवरील प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रवादीचे पदाधिकारी सातत्याने सक्रिय असल्याचे दिसून येत आहे.

> खडकवासला विधानसभा मतदारसंघात पक्षवाढीसाठी आणि जनतेच्या प्रश्नांसाठी अधिक जोमाने काम केले जाईल. खा. सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व वरिष्ठ नेते यांच्यासोबत खडकवासला विधानसभा मतदारसंघातील प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न राहील"
>
> **- संदीप पाटीलबुवा मते, खडकवासला विधानसभा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार**

त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये भाजपसमोर सक्षम पर्याय उभा करण्याच्या दृष्टीने पक्षाने संघटनात्मक बळकटीकरणाचा मार्ग स्वीकारल्याचे चित्र आहे.

खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या संभाव्य पुनर्रचनेकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने या मतदारसंघात आपले अस्तित्व अधिक मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. यापूर्वी पक्षाला या मतदारसंघातून आमदार निवडून आणण्यात यश आले नसल्याने आगामी निवडणुकीत प्रभाग ते 30 प्रमाणे पॅटर्न राबवून तगडा उमेदवार देऊन खडकवासल्यातून पहिला आमदार निवडून आणण्याचा निर्धार पदाधिकारी कार्यकर्त्यांनी केला आहे. आगामी २०२९लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील प्रत्येक भागात कार्यकर्त्यांचे संघटन वाढवून पक्षाची ताकद तळागाळापर्यंत पोहोचवण्यावर भर दिला जाईल.

## सोलरस्क्वेअरने पुण्यातील खराडी येथे नवीन सोलर सेंटर केले सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील अग्रगण्य रूफटॉप सोलर कंपनी सोलरस्क्वेअरने पुण्यात आपले दुसरे सोलर सेंटर सुरू केले आहे. खराडी येथील न्याती प्लाझामध्ये सुरू करण्यात आलेल्या या केंद्राचा उद्देश लोकांना सौर ऊर्जेबाबत योग्य माहिती देणे आणि त्यांना सोलर स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. या माध्यमातून पूर्व पुण्यातील कुटुंबांना सौर ऊर्जेची जवळून माहिती मिळेल आणि त्यांच्या गरजेनुसार मार्गदर्शन मिळू शकेल. पुण्यात रूफटॉप सोलरची मागणी सातत्याने वाढत आहे, मात्र जागरूकता आणि विश्वासाचा अभाव अजूनही अनेक कुटुंबांसाठी मोठे आव्हान आहे. हे लक्षात घेऊन सोलरस्क्वेअरने हे



केंद्र अशा प्रकारे विकसित केले आहे की, येथे लोकांना सोलर सिस्टम प्रत्यक्ष पाहता येईल, त्याची कार्यपद्धती समजून घेता येईल आणि आपल्या घरासाठी योग्य पर्याय निवडता येईल. या केंद्रामध्ये सोलरस्क्वेअरचे विशेष विंडप्रो माउंट देखील प्रदर्शित करण्यात आले आहे, जे जोरदार वारे आणि प्रतिकूल हवामानाचा सामना करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. येथे भेट देणारे नागरिक विशेष डेमोद्वारे पाहू शकतील की ही तंत्रज्ञान साधारण संरचनांच्या तुलनेत कशाप्रकारे अधिक चांगली कामगिरी करते. याशिवाय, सोलर सिस्टमची गुणवत्ता, देखभाल आणि दीर्घकालीन बचतीबाबतही माहिती दिली जाईल. केंद्रात डिजिटल स्क्रीनच्या मदतीने लोकांना त्यांच्या घराच्या छतावर सोलर पॅनेल बसवल्यानंतर ते कसे दिसेल हेही पाहता येईल. त्यामुळे कुटुंबांसाठी सोलर स्वीकारण्याचा निर्णय अधिक सोपा होईल. या प्रसंगी श्रेया मिश्रा, सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), सोलरस्क्वेअर यांनी सांगितले, "पुण्यात सोलर स्वीकारण्याची रुची सातत्याने वाढत आहे. या नव्या केंद्राच्या माध्यमातून आम्ही लोकांपर्यंत अधिक जवळ पोहोचू इच्छितो, जेणेकरून ते सौर ऊर्जेला अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतील आणि विश्वासाने ती स्वीकारू शकतील.

## कसबा गणपती विद्यार्थी दत्तक योजनेतून १५९ विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या मानाच्या पहिल्या श्री कसबा गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि श्री कसबा गणपती सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गेली २३ वर्षे राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थी दत्तक योजने अंतर्गत यावर्षी १५९ गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय शुल्क व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हॉटेल सेंट्रल पार्क, शिवाजीनगर येथे झालेल्या या कार्यक्रमास कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. हेमंत रासने, मानाचा पहिला श्री कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्री. श्रीकांत शेटे तसेच शिक्षण समुपदेशक सौ. चैत्राली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## खड्ड्यांतून प्रवास करायचा आणि विकासाच्या गप्पा ऐकायच्या?

### हे चालणार नाही : राजीव पाटील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गणपती माथा ते वारजे पूल या रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात सामाजिक कार्यकर्ते राजीव पाटील यांनी आक्रमक भूमिका घेत पुणे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. परिसरात लावण्यात आलेल्या बॅनरद्वारे त्यांनी थेट आयुक्तांना या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करण्याचे आवाहन केले आहे. सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून वाहतुकीची कोंडी, वाहनांचे नुकसान आणि अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. याबाबत वारंवार तक्रारी, निवेदने आणि पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. "खड्ड्यांतून प्रवास करायचा आणि विकासाच्या गप्पा ऐकायच्या? हे चालणार नाही," अशी स्पष्ट भूमिका मांडत राजीव पाटील यांनी नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याची




मागणी केली आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रस्त्याची अवस्था आणखी बिकट होण्याची शक्यता असून प्रशासनाने त्वरित दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अन्यथा नागरिकांच्या सहभागातून तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, या बॅनरची परिसरात मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू असून आता महापालिका प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.


## असावा एक छंद असाही

- जिद्द, सातत्य आणि मेहनतीच्या बळावर आकाश धानुरकर यांची १० हजार फॉलोअर्सपर्यंतची यशस्वी वाटचाल

**(दै. आरंभ पर्व)**

**आजच्या सोशल मीडियाच्या युगात दररोज हजारो रील्स आणि व्हिडिओ अपलोड होत असतात. काही क्षणभरासाठी चर्चेत येतात, तर अनेक गर्दीत हरवून जातात. मात्र सातत्यपूर्ण प्रयत्न, कठोर मेहनत आणि स्वतःवरचा अढळ विश्वास असेल तर छंदही यशाचा मार्ग बनू शकतो. याचाच प्रत्यय देणारे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे आकाश धानुरकर.**

नुकताच आकाशने इंस्टाग्रामवर १० हजार फॉलोअर्सचा महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. हा आकडा केवळ एक संख्या नसून त्यामागे असलेल्या असंख्य तासांच्या मेहनतीचा, संयमाचा आणि जिद्दीचा पुरावा आहे. आकाश हा पूर्णवेळ कंटेंट क्रिएटर नाही. तो कॉर्पोरेट क्षेत्रात आपली व्यावसायिक जबाबदारी सांभाळतो. दिवसातील कामाचा ताण आणि व्यस्त वेळापत्रक यांनंतरही तो आपल्या आवडीसाठी वेळ काढतो.







व्हिडिओसाठी विषयांची निवड, त्यावर सखोल अभ्यास, स्क्रिप्ट लेखन, चित्रीकरण आणि संकलन ही सर्व कामे तो स्वतःच करतो. त्यामुळे त्याचा प्रत्येक व्हिडिओ हा केवळ मनोरंजनाचे साधन नसून त्याच्या मेहनतीचा आणि समर्पणाचा आरसा ठरतो.

त्याच्या कंटेंटची आणखी एक खासियत म्हणजे विषयांची वेगळेपणाने केलेली मांडणी. प्रेक्षकांना काहीतरी नवीन शिकायला मिळावे, त्यांना विचार करायला भाग पाडावे आणि माहितीपूर्ण अनुभव द्यावा, हा त्यामागील उद्देश असतो. त्यामुळे त्याचे व्हिडिओ केवळ मनोरंजनापुरते मर्यादित राहत नाहीत, तर ज्ञानाची जोडही देतात.

> आकाश धानुरकर यांचे १० हजार फॉलोअर्स पूर्ण केल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. हा प्रवास इथेच थांबणारा नाही, याची खात्री आहे. येणाऱ्या काळात त्यांच्या कंटेंटला आणखी मोठे व्यासपीठ लाभो, लाखो प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळो आणि यशाची नवी शिखरे त्यांनी गाठावीत, हीच सदिच्छा. तसेच टीम आरंभ पर्वकडून आकाश धानुरकर यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा. कारण काही लोक फक्त स्वप्ने पाहत नाहीत... ते ती पूर्ण करण्यासाठी रोज मेहनतही घेतात! खरंच, असा एक छंद असाही... जो केवळ स्वतःला घडवत नाही, तर इतरांनाही प्रेरणा देत राहतो.

मात्र हा प्रवास सहज नव्हता. आज १० हजार फॉलोअर्सचा टप्पा दिसत असला तरी सुरुवातीच्या काळात अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. अनेक रील्सना कमी व्ह्यूज मिळत होते, रिच मर्यादित होती आणि प्रेक्षकांचा प्रतिसादही अपेक्षेइतका नव्हता. अशा परिस्थितीत अनेक जण निराश होऊन आपला प्रयत्न थांबवतात. परंतु आकाशने हार मानली नाही.

त्याचे एक वाक्य आजही प्रेरणा देणारे आहे. तो म्हणाला होता, "आपण ग्रो करणार आहोत आणि मी ग्रो झालो की माझ्या जवळच्या लोकांनाही ग्रो करणार."

या एका वाक्यात त्याचा आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि इतरांना सोबत घेऊन पुढे जाण्याची वृत्ती स्पष्टपणे दिसून येते. स्वतःच्या यशाबरोबरच इतरांच्याही प्रगतीचा विचार करणारी ही मानसिकता त्याची खरी ताकद आहे.

आज १० हजार फॉलोअर्सचा टप्पा गाठताना त्यामागे असंख्य जागलेल्या रात्री, सातत्यपूर्ण अभ्यास, स्वतःवरचा विश्वास आणि कधीही हार न मानण्याची वृत्ती उभी आहे. सोशल मीडियावरील यशाला कोणताही शॉर्टकट नसतो, हे आकाशच्या प्रवासातून अधोरेखित होते. हा केवळ एका कंटेंट क्रिएटरचा प्रवास नाही, तर आपल्या आवडीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी संदेश आहे. कारण छंदाला जेव्हा मेहनतीची जोड मिळते, तेव्हा यशाचा मार्ग आपोआप तयार होत जातो.

# नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहपूर्ण सुरुवात

- विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व पुस्तक देऊन स्वागत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांमध्ये आनंद, उत्साह आणि नव्या उमेदचे वातावरण निर्माण करण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) यांच्या वतीने कोंढवे-धावडे, न्यू कोपरे, उत्तमनगर व शिवणे परिसरातील शाळांमध्ये विशेष स्वागत उपक्रम राबविण्यात आला. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे खडकवासला अध्यक्ष अतुल धावडे यांच्या संकल्पनेतून

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व शैक्षणिक



पुस्तके देऊन मनापासून स्वागत करण्यात आले. नव्या शैक्षणिक प्रवासाला सुरुवात करणाऱ्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहून उपस्थितांनाही विशेष समाधान लाभले. विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत नियमित अभ्यास, चांगले संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कोंढवे-धावडे व न्यू कोपरे येथील शाळांमधील शिक्षकवृंदांनी युवक अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करून शुभेच्छा दिल्या. हा सन्मान स्वीकारताना शिक्षण क्षेत्राशी असलेली बांधिलकी अधिक दृढ करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमात कार्यक्षम नगरसेवक काकासाहेब चव्हाण तसेच नगरसेविका अनिलताई इंगळे यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत शिक्षणाच्या माध्यमातून मोठी स्वप्ने पूर्ण करण्याचे आवाहन केले.

## क्रिझॅकची फॉरेनॲडमिट्समध्ये धोरणात्मक गुंतवणूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या अग्रगण्य तंत्रज्ञानाधारित व्यासपीठांपैकी एक असलेल्या क्रिझॅक लिमिटेडने फॉरेनॲडमिट्स या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विद्यार्थी सेवा व्यासपीठामध्ये धोरणात्मक गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. या व्यवहारानंतर फॉरेनॲडमिट्सचे संस्थापक निखिल जैन हे क्रिझॅकमध्ये मुख्य उत्पादन आणि विपणन अधिकारी म्हणून रुजू होणार आहेत. फॉरेनॲडमिट्सने आतापर्यंत एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना सेवा दिली असून सुमारे १,५०० कोटी रुपयांहून अधिक शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून देण्यात मदत केली आहे. या गुंतवणुकीमुळे क्रिझॅकला विद्यार्थ्यांच्या परदेशातील शिक्षण प्रवासातील महत्त्वाच्या टप्प्यांवर अधिक प्रभावी सेवा देता येणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी देश व संस्था निवडणे, शैक्षणिक कर्ज मिळवणे, आर्थिक नियोजन करणे तसेच व्हिसा प्रक्रिया पूर्ण करणे यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सुविधा उपलब्ध करून देण्याचा कंपनीचा मानस आहे.





## थोडक्यात पण महत्वाचे



### पत्रकार संघाकडून सहाय्यक पोलीस आयुक्त विजय कुंभार यांचा सत्कार

पुणे (आरंभ पर्व) : परिमंडळ दोनचे सहाय्यक पोलीस आयुक्त विजय कुंभार यांचा सिंहगड पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने त्यांना शुभेच्छा देत सन्मान केला. यावेळी सिंहगड वाहतूक विभागाचे पोलिस निरीक्षक सुनिल गवळी तसेच नांदेड सिटी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल भोस उपस्थित होते. सत्कार कार्यक्रमास संघाचे खजिनदार निलेश चांदगुडे, सचिव कल्याण आवताडे, उपाध्यक्ष जागृती कुलकर्णी, राजेंद्रकृष्ण कापसे, ज्येष्ठ पत्रकार दत्ता जोरकर, ज्ञानेश्वर दळवी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात पोलीस-प्रसारमाध्यम समन्वय अधिक दृढ करण्याबाबत चर्चा करण्यात आली.



### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

बार्शी (आरंभ पर्व) : नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भांडेगाव ता बार्शी येथे प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शाळेत विशेष स्वागत करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. अनिल तावस्कर सर व सहशिक्षक श्री. नागनाथ मगर सर यांच्या पुढाकाराने नवागत विद्यार्थ्यांसाठी स्वागत मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. ट्रॅक्टर फुलांनी व फुग्यांनी सजविण्यात आला होता. विद्यार्थ्यांना कॅडबरी चॉकलेट, वह्या तसेच गोड खाऊ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर संपूर्ण गावातून ट्रॅक्टरद्वारे मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमुळे गावात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमास युवा नेते श्री. जयदत्त शिंदे, श्री. सोमनाथ डिसले, श्री. महेश शिंदे, श्री. अमोल भोसले तसेच पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नवीन विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आकर्षण निर्माण करून शिक्षणाची गोडी वाढविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा प्रवेशोत्सव अत्यंत यशस्वी ठरला. शाळा व्यवस्थापन, शिक्षकवर्ग, ग्रामस्थ व पालकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



### कोंढवे धावडे , शिवणे परिसरात विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

- सुभाष नाणेकर यांची मनपा शाळांना भेट

पुणे (आरंभ पर्व) : नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह द्विगुणित करण्यासाठी प्रभाग क्र. ३३ मधील कोंढवे धावडे, शिवणे परिसरात महानगरपालिका शाळांमध्ये विशेष स्वागत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी लोकप्रिय नगरसेवक सुभाषभाऊ नाणेकर यांनी शाळांना भेट देत विद्यार्थी, शिक्षक व पालकांशी संवाद साधला. शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करताना सुभाषभाऊ नाणेकर यांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, वह्या आणि पुस्तके भेट देऊन नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनीही आनंदाने या उपक्रमाला प्रतिसाद दिला. शाळेच्या परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास, शिस्त आणि संस्कार यांवर भर देण्यात आला. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना नवीन वर्षासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. याप्रसंगी व्यापारी अध्यक्ष सारंग राडकर, भाजप नेते सुभाष शिंदे सरकार, उद्योजक पै. राहुल मोरे तसेच अनेक पालक व स्थानिक नागरिक उपस्थित होते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि शिक्षणाबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मांजरी बुद्रुक येथे उत्साहात वृक्षारोपण

पुणे (आरंभ पर्व) : पर्यावरणाचे संवर्धन ही काळाची गरज असून, हिरवागार निसर्ग हीच भावी पिढ्यांसाठीची अमूल्य ठेव आहे. या भावनेतून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पुणे महानगरपालिकेची शाळा, मांजरी बुद्रुक येथे श्रुफिन वेल्फेअर फाऊंडेशन आणि निसर्गऋण फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका आंबिकर , गावचे पोलीस पाटील, ग्रामस्थ तसेच सामाजिक कार्यकर्त्या अर्चना सोनवणे म यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना व नागरिकांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले."झाडे हीच पृथ्वीची खरी श्वासवाहिनी आहेत. प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन केले, तर पर्यावरण संतुलन राखण्यास मोठी मदत होईल," असा संदेश मान्यवरांनी यावेळी दिला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि घटणारे हरित क्षेत्र यावर मात करण्यासाठी वृक्षलागवड हा सर्वात प्रभावी उपाय असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. "एक झाड लावा, पर्यावरण वाचवा" हा संदेश देत सर्वांनी वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा संकल्प केला.

# छोट्या पावलांनी ज्ञानमंदिरात प्रवेश

## मनपा शाळा क्रमांक ५६ मध्ये प्रवेशोत्सव उत्साहात



पुणे (दै. आरंभ पर्व)

हातात नवीन दप्तर, डोळ्यांत अनेक स्वप्ने आणि चेहऱ्यावर निरागस हास्य घेऊन आलेल्या चिमुकल्यांच्या स्वागताने कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळा, मनपा शाळा क्रमांक ५६ परिसर सोमवारी आनंदाने फुलून गेला. नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेला शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला.

शाळेच्या उंबरठ्यावर प्रथमच पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी आणि मान्यवरांनी प्रेमाने स्वागत केले. फुगे, सजावट, आनंददायी उपक्रम आणि स्वागतगीतांमुळे शाळेचे वातावरण अक्षरशः उत्सवमय झाले होते. काही चिमुकले नवीन वातावरणामुळे बुजलेले दिसत होते, तर काहीजण नव्या मित्रांना भेटण्याच्या आनंदात रमले होते.

या प्रसंगी पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका सौ. कोमल सारंग नवले ताई, हरिदास चरवड, सारंगदादा नवले तसेच पुणे महानगरपालिकेच्या पर्यवेक्षिका नंदा डोळस मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सुमन गंथडे यांच्यासह स्वाती पडवळ म, संध्या चांदगुडे , अनिता शितोळे ,माधवी पंडित , संगीता जागडे, सविता रासोटे , शिल्पा डुके , प्रियांका देवकुळे तसेच गणेश पतंगे सर आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना खाऊ आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि आपल्या पाल्याला शाळेत सोडताना पालकांच्या डोळ्यांतील समाधान हे दृश्य सर्वांनाच भावूक करून गेले.

शाळेचा पहिला दिवस हा प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असतो. त्या क्षणाला आनंद, प्रेम आणि आपुलकीची जोड देत मनपा शाळा क्रमांक ५६ ने नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात केली. शिक्षणाच्या या पवित्र प्रवासात चिमुकल्यांची स्वप्ने बहरावीत आणि त्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे, हाच संदेश या प्रवेशोत्सवातून देण्यात आला.

याशिवाय ह्या कार्यक्रमासाठी पायगुडे विनया, रेश्मा नवले,उर्मिला दराडे, वैजनाथ दराडे, मनोहर थिटे ,माळी सर, वैभव फटांगरे ,कदम सर आणि राणी इष्टे मॅडम उपस्थित होते. याशिवाय बालवाडी शिक्षिका अंजली ढवळे , सोनाली महाडिक आणि सुवर्णा इनामदार यांचीही उपस्थिती लाभली.

## कुटुंबातील वारसांना शासकीय नोकरी शासनाने द्यावी

- सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे, अनिल माळवी यांची मागणी

पुणे (दै. आरंभ पर्व)

अत्यंत दुःखद आणि मन सुन्न करणारी बातमी... 24 मे रोजी महाबळेश्वर येथील आंबेनळी घाटात झालेल्या भीषण अपघातात आसगाव, गावातील सातारा जिल्ह्य येथील आठ तरुण मुलांचा अकाली व दुर्दैवी मृत्यू झाल्याची बातमी ऐकून संपूर्ण गाव, नातेवाईक, मित्रपरिवार आणि समाजमन हादरून गेले आहे. आज आसगावने फक्त आठ व्यक्ती गमावलेल्या नाहीत, तर आठ कुटुंबांचे आधार, आठ घरांची स्वप्ने, आठ आई-वडिलांच्या आशा, भावंडांचे प्रेम आणि मित्रांच्या आठवणी गमावल्या आहेत. ज्या घरांमध्ये कालपर्यंत हसू, गप्पा, स्वप्ने आणि भविष्याचे नियोजन होते, त्या घरांमध्ये आज निःशब्द वेदना आणि अश्रू आहेत. महेश अनिल पवार, रितेश राजेंद्र लोखंडे, अनिल अभिमन्यू शिंगटे, उत्कर्ष आनंद शिंगटे, आदित्य अशोक साळुंखे, सुहास जितेंद्र लोखंडे, अंश समीर चव्हाण आणि नितीन किसन नायकोंडे या आपल्या लेकरांनी इतक्या लहान वयात जगाचा निरोप घ्यावा लागणे ही अत्यंत वेदनादायक आणि असह्य बाब आहे. देवाने ही परीक्षा त्यांच्या कुटुंबांना का दिली याचे उत्तर कदाचित कुणाकडेही नसेल; पण आज आपण यांच्या कुटुंबियांसोबत खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे आज त्यांची कुटुंब सावरून समाजात उभे राहणे गरजेचे आहे या प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला किंवा त्यांच्या वारसाला शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था ,अशा ठिकाणी शासनाने नोकरी देऊन त्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे प्रत्येकाची परिस्थिती नाजूक आहे राज्य शासनाने या कुटुंबाचा आधारवड होणे गरजेचे आहे जेणेकरून हे कुटुंब काही प्रमाणात का होईना सावरले जातील.



### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळे येथे विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

बार्शी (दै. आरंभ पर्व)

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळे येथे शाळा प्रवेशोत्सव आणि विद्यार्थ्यांच्या स्वागताचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शाळेच्या परिसरात आनंद, उत्साह आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. नवागत विद्यार्थ्यांचे फुलांच्या वर्षावात व टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच शिक्षणाचे महत्त्व, नियमित शाळेत उपस्थिती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नव्या शैक्षणिक वर्षाची उत्सुकता आणि आनंद स्पष्टपणे दिसून येत होता. या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा पूजा भोसले, मुख्याध्यापक शाहू बाबर सर, सचिन गावसाने सर, अनिल गवळी सर, वैशाली जांभळे , माजी सैनिक विजयकुमार जाधव, प्रकाशभैया गाटे, धनंजय चौधरी, विजय महापुरे,तीर्थंनकर काटकर, नागेश भोसले, रामा पवार तसेच समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत २१ पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश





पुणे (दै. आरंभ पर्व)

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आदित्य ठाकरे यांनी आहे पुण्यातील संकल्प कार्यालयात कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. या मेळाव्यादरम्यान खडकवासला विधानसभा मतदारसंघातील मनसे व इतर पक्षांतील २१ पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

खडकवासला विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवेश पार पडला. यावेळी पुणे जिल्हा संपर्क प्रमुख आमदार सचिनभाऊ अहिर, संपर्क प्रमुख गजानन थरकुडे, शहर प्रमुख वसंत मोरे गट नेते नितीन गावडे जिल्हा प्रमुख प्रकाश भेगडे यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रवेशानंतर बोलताना आदित्य ठाकरे यांनी पुण्यातील नागरिकांच्या प्रश्नांवर शिवसेना आक्रमकपणे आवाज उठवणार असल्याचे सांगितले. तसेच खडकवासला विधानसभा मतदारसंघातील स्थानिक प्रश्न, विकासकामे आणि नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पक्ष विशेष लक्ष देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांमध्ये बाळासाहेब मंडलिक सुरेश भाऊ देशमुख जितेंद्र सपकाळ राजेश रासकर सिद्धार्थ पोकळे शशिकांत हनमघर सचिन काटे सुभाष शिंदे अंकुश तोंडे संतोष शिंदे अक्षय सनस मिलिंद गवळी किशोर डेंगळे सागर पाटील दत्ता मरगळे सुनील काकडे मुनीर शेख सचिन पलंगे संजय मापारी अशोक लांडे तुषार देशमुख जणांनी प्रवेश केला.

या प्रवेशामुळे खडकवासला विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाला बळ मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माध्यमातून खडकवासला विधानसभा मतदारसंघातील जनतेचे प्रश्न मांडण्याकडे आमचे विशेष लक्ष असणार आहे... 80 टक्के समाजकारण 20 टक्के राजकारण ध्यास ठेवून राजकारण करणारे असल्याचे शिवाजीराव मते यांनी सांगितले.

# झटपट श्रीमंतीचा मोह की शिस्तबद्ध गुंतवणूक?

## सट्टा नाही, भविष्यातल्या पैशांचा पत्ता आहे!

(दै. आरंभ पर्व)

**भारतात शेअर बाजाराबाबत एक मोठा गैरसमज आजही समाजात खोलवर रुजलेला दिसतो. शेअर बाजाराचे नाव घेतले की अनेकांच्या मनात "सट्टा", "जुगार", "धोका" किंवा "एका दिवसात पैसा दुप्पट करण्याचे साधन" अशा प्रतिमा उभ्या राहतात. अनेक कुटुंबांमध्ये आजही शेअर बाजारात गुंतवणूक करणे म्हणजे पैसे वाया घालवणे, अशी धारणा आहे. मात्र वास्तव यापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे.**




खरे तर शेअर बाजार हा केवळ आकड्यांचा खेळ नसून देशाच्या आर्थिक विकासाचा आरसा आहे. उद्योग, व्यवसाय, रोजगार, उत्पादन आणि आर्थिक वाढ यांच्याशी त्याचा थेट संबंध असतो. एखाद्या कंपनीच्या प्रगतीत सामान्य नागरिकाला भागीदार होण्याची संधी देणारी ही एक अद्वितीय व्यवस्था आहे. त्यामुळे शेअर बाजाराला सट्ट्याचे स्वरूप देणे म्हणजे त्याच्या मूळ उद्देशालाच कमी लेखणे होय.

जेव्हा एखादी व्यक्ती कंपनीचा शेअर खरेदी करते, तेव्हा ती केवळ कागदाचा तुकडा विकत घेत नसते. ती त्या कंपनीच्या भविष्यातील वाढीवर विश्वास व्यक्त करत असते. कंपनी नफा कमावते, व्यवसाय वाढवते, नवीन बाजारपेठा मिळवते, तेव्हा त्या वाढीचा लाभ भागधारकांनाही मिळतो. त्यामुळे शेअर बाजार हा प्रत्यक्षात देशाच्या उद्योगविश्वाशी जोडलेला आर्थिक सहभागाचा मार्ग आहे.

तथापि, आजच्या डिजिटल युगात बाजाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन अनेकदा चुकीचा ठरत आहे. समाजमाध्यमांवरील तथाकथित तज्ज्ञ, क्षणार्धात श्रीमंत होण्याची स्वप्ने दाखवणारे संदेश, विविध गटांमधून फिरणाऱ्या अफवा आणि "आज खरेदी करा, उद्या दुप्पट पैसे मिळवा" अशा भ्रामक आश्वासनांमुळे अनेक जण गुंतवणुकीऐवजी सट्टेबाजीच्या मानसिकतेने बाजारात प्रवेश करतात. परिणामी काही वेळा नफा मिळाला तर स्वतःला बाजारातील जाणकार समजले जाते आणि तोटा झाला तर संपूर्ण शेअर बाजारालाच दोष दिला जातो. पण प्रश्न बाजाराचा नसतो; प्रश्न दृष्टिकोनाचा असतो. अभ्यासाशिवाय, माहितीशिवाय आणि नियोजनाशिवाय घेतलेले निर्णय हे गुंतवणूक नसून निव्वळ अंदाज असतात. आणि अंदाजावर उभा असलेला व्यवहार हा सट्टाच ठरतो. जगातील यशस्वी गुंतवणूकदारांचा इतिहास पाहिला तर त्यात एक गोष्ट समान दिसते – संयम. जागतिक स्तरावरील प्रसिद्ध गुंतवणूकदार वॉरेन बफे यांनी संपत्ती एका दिवसात निर्माण केलेली नाही. त्यांनी दशकानुदशके गुणवत्तापूर्ण कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली, बाजारातील चढ-उतारांना घाबरले नाहीत आणि दीर्घकालीन दृष्टीकोन कायम ठेवला. त्यांच्या यशामागे नशीब नव्हे तर अभ्यास, शिस्त आणि सातत्य होते.

तसेच जगातील अनेक अब्जाधीशांची संपत्ती ही त्यांच्या कंपन्यांमधील भागभांडवलातून निर्माण झाली आहे. उद्योग उभारणे, त्याची वाढ साधणे आणि त्यातील हिस्सेदारी जपणे या प्रक्रियेतून त्यांनी संपत्ती निर्माण केली. यामागे झटपट श्रीमंतीची मानसिकता नव्हती; तर भविष्याचा विचार आणि दीर्घकालीन नियोजन होते.

भारतातही गेल्या दोन दशकांत शेअर बाजाराने दीर्घकालीन गुंतवणूकदारांना मोठा परतावा दिला आहे. अनेक दर्जेदार कंपन्यांनी आपल्या भागधारकांची संपत्ती अनेक पटींनी वाढवली आहे. मात्र हा लाभ त्यांनाच मिळाला ज्यांनी संयम ठेवला, नियमित गुंतवणूक केली आणि बाजारातील तात्पुरत्या चढ-उतारांकडे दुर्लक्ष केले.

आज गरज आहे ती आर्थिक साक्षरतेची. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये आर्थिक शिक्षणाला पुरेसे स्थान मिळत नाही. त्यामुळे बचत, गुंतवणूक, जोखीम आणि संपत्ती निर्मिती याबाबत अनेक गैरसमज समाजात टिकून आहेत. जर नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवायचे असेल, तर शेअर बाजाराची योग्य माहिती आणि गुंतवणुकीची शिस्त यांचा प्रसार होणे आवश्यक आहे.

शेअर बाजारात जोखीम आहे, हे नक्कीच सत्य आहे. परंतु जोखीम आणि सट्टा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. योग्य माहिती, विविधीकरण, संयम आणि दीर्घकालीन दृष्टिकोन यांच्या आधारे जोखीम नियंत्रित करता येते. पण लोभ, अफवा आणि अज्ञान यांच्या आधारे घेतलेले निर्णय मात्र नुकसानाला आमंत्रण देतात.

म्हणूनच शेअर बाजाराला दोष देण्याआधी प्रत्येक गुंतवणूकदाराने स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा – मी गुंतवणूक करतोय की सट्टा खेळतोय?

कारण बाजाराचे नियम आजही तेच आहेत. तो अभ्यास करणाऱ्याला संधी देतो, संयम बाळगणाऱ्याला फळ देतो आणि घाई करणाऱ्याला धडा शिकवतो.

शेअर बाजार हा एका दिवसाचा खेळ नाही; तो भविष्य घडविण्याचा प्रवास आहे. संपत्ती निर्माण करण्याचे, आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याचे आणि देशाच्या विकासात सहभागी होण्याचे एक प्रभावी साधन आहे.

म्हणूनच शेअर बाजाराकडे जुगार म्हणून नव्हे, तर ज्ञान, शिस्त आणि दूरदृष्टी यांच्या आधारावर पाहण्याची वेळ आली आहे.

कारण शेअर बाजार हा सट्टा नाही... तो खरंच भविष्यातल्या पैशांचा पत्ता आहे!

## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘इग्नाईट-२०२६’ परिषदेचे १७ ते १९ जूनला पुण्यात आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : येवलेवाडी येथील केजे एज्युकेशनल इन्स्टिट्यूट्स संचालित केजे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट रिसर्चतर्फे इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर्स (आयईईई) पुणे सेक्शन यांच्या तांत्रिक सहकार्याने इनोव्हेशन अँड ग्रोथ इन नेक्स्ट-जन इंटेलिजंट टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग (इग्नाईट) २०२६ या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केजे एज्युकेशनल इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक अध्यक्ष श्री. कल्याण जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी संस्थेचे तांत्रिक संचालक डॉ. अजय फुलंबरकर, अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, प्राचार्य डॉ. सुहास खोत, 'इग्नाईट'च्या चेअरपर्सन डॉ. निकिता कुलकर्णी, 'आयईईई'चे प्रतिनिधी प्रा. रहिमराजा शेख आदी उपस्थित होते.

### बाळाच्या पचनसंस्थेत अडकलेली हेअरपिन काढून वाचवला जीव

पुणे (आरंभ पर्व) : मणिपाल हॉस्पिटल, खराडी येथील डॉक्टरांनी दीड महिन्यांच्या बाळाच्या पचनसंस्थेत अडकलेली हेअरपिन तातडीच्या एंडोस्कोपिक प्रक्रियेद्वारे यशस्वीरित्या काढून संभाव्य गंभीर गुंतागुंत टाळली. घरी खेळत असताना चुकून हेअरपिन गिळल्यामुळे बाळाला घटनेनंतर सुमारे दोन तासांनी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तातडीने करण्यात आलेल्या पोटाच्या एक्स-रेमध्ये ही हेअरपिन पोटाच्या खालच्या भागात किंवा लहान आतड्याच्या सुरुवातीच्या भागात पोहोचल्याचे आढळून आले. हेअरपिन उघडी असल्याने पोट किंवा लहान आतड्याला छिद्र पडण्याचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळे या प्रकरणाकडे वैद्यकीय आणीबाणी म्हणून पाहण्यात आले.

### तळजाई टेकडीवर वृक्षारोपण व स्वच्छता अभियान




पुणे (आरंभ पर्व) : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून श्रीमद राजचंद्र लव्ह अँड केअर, पुणे सेंटरच्या वतीने तळजाई टेकडी येथे वृक्षारोपण व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे उद्घाटन पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका सौ. स्मिता वस्ते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी पर्यावरण संरक्षणासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. अशा सामाजिक उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. या अभियानात श्रीमद राजचंद्र लव्ह अँड केअर, पुणे सेंटरचे सदस्य भरत मेहता, जिग्नेश फुरिया, भावेश शाह यांच्यासह अनेक सेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. उपस्थितांनी मोठ्या उत्साहाने विविध प्रकारच्या रोपांचे वृक्षारोपण केले. तसेच तळजाई टेकडी परिसरातील रस्त्यांच्या कडेला स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला.

### जेसीबी इंडियाने ६,००,००० व्या मशीनचा टप्पा गाठला




पुणे (आरंभ पर्व) : जेसीबी इंडियाने आपल्या 6,00,000 व्या मशीनचे उत्पादन आणि विक्री करून एक मोठा मैलाचा दगड गाठला आहे. हा टप्पा म्हणजे देशाच्या पायाभूत सुविधांच्या विकासात योगदान देणारे ग्राहक, डीलर्स, पुरवठादार आणि स्थानिक समुदायांसोबत चार दशकांहून अधिक काळाच्या भागीदारीचे प्रतीक आहे. ही 6,00,000 वी मशीन एक बॅकहो लोडर आहे, जी पायाभूत सुविधा, ग्रामीण आणि कृषी क्षेत्रातील वैविध्यतता व कार्यक्षमतेसाठी ओळखली जाणारी आणि देशात सर्वाधिक वापरली जाणारी बांधकाम मशीन आहे. गेल्या काही वर्षांत, कंपनीने आपल्या उत्पादनाचा विस्तार केला आहे, प्रबळ पुरवठादार परिसंस्था तयार केली आहे आणि स्थानिक परिस्थितीला अनुकूल अशी उत्पादने विकसित केली आहेत. सहा अत्याधुनिक उत्पादन केंद्रांसह भारत जेसीबीसाठी प्रमुख जागतिक उत्पादन केंद्र बनला आहे. भारतामधून 135 हून अधिक देशांमध्ये मशीन्सची निर्यात केली जाते. याप्रसंगी मत व्यक्त करत जेसीबी इंडियाचे सीईओ आणि मॅनेजिंग डायरेक्टर श्री. दीपक शेट्टी म्हणाले, “हा मैलाचा दगड केवळ एका आकड्यापुरता मर्यादित नाही, तर अनेक दशकांपासून ग्राहकांनी जेसीबीवर दाखवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे.

### विचारपूर्वक निवडलेल्या फादर्स डे भेटवस्तू – नेहमीच्या पर्यायांपलीकडे



पुणे (आरंभ पर्व) :वडील आपल्या आयुष्यात दररोज एका खास पद्धतीने साथ देत असतात. मदतीसाठी सर्वप्रथम पुढे येणारे, स्वतःसाठी काहीही न मागणारे आणि कोणत्याही परिस्थितीत ज्यांच्यावर आपण विश्वास ठेवू शकतो असे ते असतात. त्यांची काळजी घेण्याची पद्धत शांत, सातत्यपूर्ण आणि कायमसोबत असणारी असते. या फादर्स डे निमित्त त्यांना अशा भेटवस्तू द्या ज्या विचारपूर्वक निवडलेल्या, उपयुक्त आणि वैयक्तिक वाटतील. भव्य भेटवस्तू नव्हे, तर रोजच्या आयुष्यात थोडा अधिक आनंद आणि सोय आणणारे छोटेसे बदल. कारण फादर्स डे हा फक्त भेटवस्तू देण्याचा दिवस नाही. तर त्यांनी आपल्या आयुष्यासाठी केलेल्या त्या असंख्य छोट्या गोष्टींसाठी त्यांचे आभार मानण्याची एक संधी आहे, ज्या ते अनेकदा कोणत्याही अपेक्षेशिवाय करत असतात.

# धायरीतील व्यंकटसाई किचनच्या अल्पदरातील नाश्त्याला ग्राहकांची पसंती

## व्यंकटसाई किचन सर्व केटरिंग सेवेसाठी सज्ज




**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी येथील व्यंकटसाई किचन अँड केटरिंग सर्व्हिसेसने महागाईच्या काळात सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारी अनोखी योजना सुरू केली होती .अवघ्या १० रुपयांत नाश्ता आणि ५ रुपयांत चहा उपलब्ध करून दिला जात होता. या उपक्रमाला परिसरातील ग्राहकाकडून मोठा प्रतिसाद मिळाला.

शुभारंभपासून सुरुवातीला काल १४ तारखेपर्यंत सुरू असलेली ही विशेष योजना ग्राहकांच्या पसंतीमुळे चांगलीच लक्षवेधी ठरली आहे.. जवळपास हजारो ग्राहकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. न्यू आर्या फाउंडेशन, व्यंकटसाई होंडा, साईव्यंकट मोटर्स यानंतर व्यंकटसाई किचन ही संतोष कदम यांची चौथी संस्था असून, सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांसाठी उपयुक्त सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. व्यंकटसाईकिचन अँड केटरिंग सर्विसेचे संचालक संतोष कदम यांना या क्षेत्रातील वीस वर्षाचा समृद्ध अनुभव आहे. त्यांच्या संयोजनातून लग्न समारंभ, साखरपुडा, वाढदिवस, गृहप्रवेश, मुंज तसेच कॉर्पोरेट इव्हेंट्ससाठी ५० ते १००० लोकांपर्यंतच्या जेवणाची व्यवस्था केली जाते. स्वादिष्ट भोजन, वेळेवर सेवा, परवडणारे दर आणि मेनूमध्ये अनेक पर्याय ही या संस्थेची वैशिष्ट्ये आहेत.

अत्यंत रास्त दरामध्ये दर्जेदार खाद्यपदार्थ उपलब्ध होत असल्याने नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले .

याबाबत संतोष कदम म्हणाले, "नागरिकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. व्यंकट साई किचनच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या केटरिंग सेवा माफक दरात उपलब्ध करून देत आहोत. नागरिकांनी आमच्या सेवेला प्रतिसाद द्यावा." धायरी परिसरात सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे सर्वसामान्य नागरिकाकडून कौतुक व्यक्त करण्यात आले. असून, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या सेवेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

संपर्कासाठी पत्ता : व्यंकटसाई किचन अँड केटरिंग सर्व्हिसेस गल्ली नं. २१ ए, रायकरनगर, व्यंकटसाई होंडा शेजारी, सिंहगड रोड, धायरी, पुणे – ४१ संपर्क .8080 24 1823

# उच्छिल येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव




**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

आदिवासी दुर्गम भागातील उच्छिल ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सोमवार दि. १५ जून रोजी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात प्रभातफेरी काढून, फेटे बांधून, पुष्पगुच्छ, गुलाबपुष्प, खाऊ व औक्षण करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तके, गणवेश, दप्तर व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. उच्छिल केंद्राचे केंद्रप्रमुख मधुकर आढारी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सविता नवले, उपाध्यक्ष सागर बांबळे, सदस्य अमोल नवले, शिवाजी नवले, रवींद्र भालेराव, अशोक भालेराव, कांचन नवले, माजी उपाध्यक्ष गणपत भालेराव, अशोक नवले तसेच पालक सदस्या रेणुका नवले, साधना बगाड, विमल करवंदे, हिराबाई नवले तसेच पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिष्यवृत्ती, नवोदय, शैक्षणिक गुणवत्ता व विविध सहशालेय उपक्रमांमध्ये शाळेने मिळविलेल्या यशाचा गौरव केला. तसेच गावातील प्रत्येक विद्यार्थ्याने जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घ्यावा व शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थांनी एक पाऊल पुढे टाकावे, असे आवाहन करण्यात आले. प्रास्ताविक पदवीधर शिक्षक सुभाष मोहरे यांनी केले. आरती मोहरे यांनी संयोजन केले. मुख्याध्यापिका स्मिता ढोबळे यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत, शैक्षणिक साहित्य वितरण व गोड जेवणामुळे प्रवेशोत्सव आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

# नूतन इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे आनंदी वातावरणात स्वागत





**धायरी (दै. आरंभ पर्व)**

नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एका नव्या प्रवासाची सुरुवात. याच भावनेने धायरी येथील नूतन प्री-प्रायमरी स्कूल, गणेशनगर शाखा तसेच नूतन इंग्लिश मीडियम स्कूल, रायकर मळा शाखेत शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे अतिशय उत्साहपूर्ण, आनंदी आणि भावनिक वातावरणात स्वागत करण्यात आले. लहानग्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे निरागस हास्य, नवीन दप्तर, नवीन पुस्तके आणि शाळेबद्दलची उत्सुकता यामुळे संपूर्ण परिसर आनंदाने फुलून गेला होता. अनेक विद्यार्थ्यांसाठी हा शाळेतील पहिलाच दिवस असल्याने काहींच्या डोळ्यांत कुतूहल तर काहींच्या मनात थोडीशी भीती होती. मात्र शिक्षकांनी प्रेमाने आणि आपुलकीने त्यांचे स्वागत करत त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. विद्यार्थ्यांचे क्राफ्ट गिफ्ट देऊन स्वागत करण्यात आले. तसेच औक्षण करून त्यांच्या शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. शाळेच्या प्रवेशद्वारापासूनच आकर्षक सजावट करण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक दोघांनाही आनंददायी वातावरणाचा अनुभव घेता आला. यावेळी नूतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या संस्थापिका सुनीता डांगे, प्राचार्या सौ. प्रियांका आशिष चोटलीया, व्यवस्थापक राजाराम डांगे यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षिका व कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेम, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संकल्प व्यक्त केला. पालकांनी देखील शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी केलेल्या विशेष आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. नवीन स्वप्ने, नवीन आशा आणि ज्ञानाच्या नव्या वाटेवर पाऊल टाकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळेचा पहिला दिवस खऱ्या अर्थाने अविस्मरणीय ठरला.

# साकतची सानिका खटाळ झाली डॉक्टर

- जिद्द, चिकाटी व सातत्यपूर्ण अभ्यासाचे यश



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ग्रामीण भागातून शिक्षण घेत आपल्या मेहनतीच्या बळावर वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी झेप घेणाऱ्या साकत (ता. बार्शी) येथील कु. सानिका सुनील खटाळ हिने एमबीबीएस पदवी संपादन करून डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथून तिने वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले असून तिच्या या यशामुळे साकत, वैराग आणि बार्शी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

"कष्टांनी कोणतेही शिखर गाठता येते. उद्दिष्ट निश्चित करून त्या दिशेने सातत्याने प्रयत्न केले तर यश निश्चित मिळते," हा संदेश सानिकाने आपल्या यशातून दिला आहे. जिद्द, चिकाटी, एकपाठी अभ्यास आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर तिने हे यश मिळवले आहे. सानिकाचे प्राथमिक शिक्षण नवीन मराठी विद्यालय, पंचशीलनगर (वैराग) येथे झाले. त्यानंतर विद्या मंदिर कन्या प्रशाला, वैराग येथे शिक्षण घेत तिने मार्च २०१९ मध्ये दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवला. पुढे अकरावी व बारावीचे शिक्षण दयानंद महाविद्यालय, लातूर येथे पूर्ण करत मार्च २०२१ च्या बारावी बोर्ड परीक्षेतही प्रथम क्रमांक पटकावला.

शालेय जीवनापासूनच सानिका गुणवंत विद्यार्थिनी म्हणून ओळखली जात होती. इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत तिने जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले होते. तर इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात २६ वा क्रमांक मिळवत आपल्या बुद्धिमत्तेची वेगळी छाप पाडली होती. शैक्षणिक वाटचालीतील ही यशस्वी पायाभरणी पुढे तिच्या वैद्यकीय शिक्षणासाठी उपयुक्त ठरली.

बारावीनंतर नीट (NEET-UG) परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळवत तिने एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला. त्यानंतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथे वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून तिने डॉक्टर होण्याचे स्वप्न सत्यात उतरवले.

सानिकाचे वडील सुनील खटाळ हे शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळात विज्ञान व गणित विषयाचे शिक्षक असून आई गृहिणी आहेत. घरातील शैक्षणिक वातावरण, पालकांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे सहकार्य आणि स्वतःची अथक मेहनत यांच्या बळावर सानिकाने यशाचे हे शिखर गाठले आहे.

मुलीच्या यशाबद्दल बोलताना सुनील खटाळ म्हणाले, "यश मिळवण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि सातत्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

तुम्ही कोणत्याही क्षेत्रात असाल, कोणत्याही परिस्थितीतून पुढे येत असाल, तरी अभ्यासच तुम्हाला यशाच्या शिखरापर्यंत घेऊन जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास, कठोर परिश्रम आणि ध्येयाप्रती निष्ठा ठेवणे आवश्यक आहे. यशाचा कोणताही शॉर्टकट नसतो."

आपल्या यशाचे श्रेय पालक, शिक्षक आणि कुटुंबीयांना देत सानिका म्हणाली, "ध्येय निश्चित करून त्यासाठी मनापासून मेहनत घेतली तर यश नक्की मिळते. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःवर विश्वास ठेवून सातत्याने प्रयत्न करावेत."

भविष्यात एमडी अथवा एमएस पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून समाजातील गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा देण्याचे सानिकाचे ध्येय आहे. वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत समाजसेवेचे व्रत जोपासण्याचा तिचा मानस आहे.

**एकपाठी अभ्यास, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर सानिकाने डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण केले असून तिची यशोगाथा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सानिकाच्या पुढील वाटचालीसाठी दैनिक आरंभपर्व तर्फे हार्दिक शुभेच्छा...**

मा. श्री. लक्ष्मण साबळे, निवासी संपादक, 8605284272

# सत्ता, पक्षांतर आणि जनतेची फसवणूक

**लोकशाही व्यवस्थेचा पाया हा जनतेच्या विश्वासावर उभा असतो. मतदार मतदान करताना केवळ एखाद्या व्यक्तीची निवड करत नाही, तर तो एका विचारसरणीला, धोरणाला आणि भविष्याच्या दिशेला मान्यता देत असतो. त्यामुळे निवडणूक हा केवळ सत्तेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग नसून जनतेने दिलेला एक पवित्र कौल असतो. परंतु गेल्या काही वर्षांत देशातील आणि राज्यातील राजकारणात घडणाऱ्या घटनांनी या जनादेशाच्या पावित्र्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.**




**(दै. आरंभ पर्व)**

आज मतदारांच्या मनात एक मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे – आपण मतदान कोणासाठी करतो? विचारांसाठी, पक्षासाठी की केवळ निवडून आल्यानंतर बदलणाऱ्या सत्तासमीकरणांचा भाग होण्यासाठी?

निवडणुकीपूर्वी नेते ज्या पक्षाच्या ध्येयधोरणांची स्तुती करतात, प्रतिस्पर्धी पक्षांवर कठोर टीका करतात, त्याच नेत्यांना काही महिन्यांत किंवा काही वर्षांत विरोधकांच्या गोटात सामील होताना जनता पाहते. निवडणूक प्रचारात ज्या विचारधारेविरोधात जनतेकडे मत मागितले जाते, त्याच विचारधारेसोबत सत्तेसाठी हातमिळवणी केली जाते. परिणामी मतदारांच्या मनात निर्माण झालेला विश्वास डळमळीत होतो. लोकशाहीत पक्षांतराला कायदेशीर चौकट आहे. काही परिस्थितींमध्ये मतभेदांमुळे किंवा राजकीय परिस्थितीमुळे भूमिका बदलणे अपरिहार्य असू शकते. परंतु प्रश्न केवळ कायदेशीरतेचा नाही; प्रश्न नैतिकतेचा आहे. जनतेने एका विचारासाठी निवडून दिलेला प्रतिनिधी अचानक दुसऱ्या विचारांच्या छत्राखाली जात असेल, तर त्या जनादेशाचे काय होते? मतदारांची संमती न घेता त्यांचा कौल बदलण्याचा अधिकार कोणाला दिला आहे?

एकेकाळी राजकारण तत्त्वनिष्ठ मानले जात होते. स्वातंत्र्यलढ्यापासून ते पुढील अनेक दशकांपर्यंत विचार, धोरणे आणि सामाजिक बांधिलकी ही राजकारणाची प्रमुख मूल्ये होती. नेते पक्षासाठी नव्हे, तर तत्त्वांसाठी ओळखले जात होते. मतभेद असले तरी विचारांशी प्रामाणिक राहण्याची परंपरा होती. आज मात्र चित्र बदलले आहे. विचारसरणीपेक्षा सत्तेची गणिते अधिक महत्त्वाची ठरत आहेत. पक्ष बदलणे, गट स्थापन करणे, युती तोडणे किंवा नव्या युती करणे हे सर्व निर्णय अनेकदा जनहितापेक्षा सत्तेतील सहभागाच्या निकषावर घेतले जात असल्याचे दिसते.

याचा सर्वात मोठा परिणाम लोकशाहीवरील विश्वासावर होतो. जेव्हा मतदाराला वाटू लागते की त्याचे मत केवळ आकडेवारीपुरते मर्यादित आहे, तेव्हा मतदान प्रक्रियेबद्दलची आस्था कमी होते. लोकशाहीची खरी ताकद ही नागरिकांच्या सक्रिय सहभागात असते. जर नागरिकांनाच त्यांच्या मताचे मूल्य उरले नाही असे वाटू लागले, तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरते. आज देशातील अनेक राजकीय घडामोडींमध्ये जनादेशाच्या अर्थाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. निवडणूक निकालानंतर घडणारे सत्तांतर, पक्षांतर आणि राजकीय पुनर्रचना यामुळे मतदार अनेकदा गोंधळून जातो. ज्यांना विरोधासाठी निवडून दिले, ते सत्तेत जातात; ज्यांच्याविरोधात मतदान केले, त्यांच्यासोबत सरकार स्थापन होते. अशा परिस्थितीत मतदारांच्या मनात निर्माण होणारी अस्वस्थता स्वाभाविक आहे. याच पार्श्वभूमीवर न्यायव्यवस्थेची भूमिकाही महत्त्वाची ठरते. लोकशाहीतील प्रत्येक संस्थेचे कार्य जनादेशाचे संरक्षण करणे हे आहे. पक्षांतर, अपात्रता, निवडणूकपूर्व आणि निवडणुकीनंतरच्या राजकीय आघाड्या यांसारख्या प्रश्नांवर वेळेवर आणि स्पष्ट निर्णय होणे आवश्यक आहे. न्याय मिळण्यास विलंब झाला तर राजकीय समीकरणे बदलून जातात आणि जनतेच्या मनातील प्रश्न अनुत्तरित राहतात. त्यामुळे न्यायव्यवस्था केवळ निष्पक्ष नव्हे तर प्रभावी आणि वेळेवर कार्यरत असणेही तितकेच आवश्यक आहे.

सत्ता महत्त्वाची असते. विकासकामे, धोरणनिर्मिती आणि प्रशासन चालविण्यासाठी सत्तेची गरज असते. मात्र सत्ता हे साधन असले पाहिजे, ध्येय नव्हे. जेव्हा सत्ताच राजकारणाचे अंतिम लक्ष्य बनते, तेव्हा तत्त्वे, निष्ठा, विचार आणि जनभावना दुय्यम ठरू लागतात. लोकशाहीचे खरे सौंदर्य सत्तेच्या बदलात नसून जनतेच्या इच्छेचा आदर राखण्यात आहे.

आजची खरी गरज आहे ती राजकीय नैतिकतेच्या पुनर्स्थापनेची. कायदेशीर अधिकारांसोबत नैतिक जबाबदारीची जाणीवही तितकीच महत्त्वाची आहे. जनतेने ज्या विश्वासाने मतदान केले, त्या विश्वासाचा मान राखणे हे प्रत्येक लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. अन्यथा निवडणुका केवळ औपचारिकता ठरतील आणि लोकशाहीचा आत्माच कमकुवत होईल.

> कारण शेवटी लोकशाहीची खरी ताकद सत्तेत नसते; ती जनतेच्या विश्वासात असते. आणि जनादेश हा जनतेचा असतो. सत्तेच्या दालनात त्याचा विसर पडू लागला, तर लोकशाहीची खरी हानी तेथूनच सुरू होते.

**जनता सर्व काही पाहत असते. ती शांत असली तरी अनभिज्ञ नसते. राजकीय समीकरणे बदलू शकतात, सत्तेची दालने बदलू शकतात, पण जनतेच्या मनातील विश्वास एकदा ढासळला की तो पुन्हा मिळवणे अत्यंत कठीण असते. म्हणूनच प्रत्येक लोकप्रतिनिधीने आणि प्रत्येक राजकीय पक्षाने स्वतःला हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे – आपण जनादेशाचा मान राखत आहोत की सत्तेच्या मोहात त्याचा विसर पाडत आहोत?**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### रामदास आठवले यांच्या भूमिकेचा विपर्यास करण्याचा प्रयत्न निंदनीय

पुणे (आरंभ पर्व) : अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करणे हे समाजात अंतर्गत फूट निर्माण करणारे ठरू शकते. त्यामुळे पक्षाचा त्याला प्राथमिक विरोध आहे. मात्र, उपवर्गीकरण करायचेच असल्यास ते लोकसंख्येच्या अचूक प्रमाणावर आधारित असावे आणि राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण झाल्यानंतरच त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी पुण्याचे उपमहापौर तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे नेते परशुराम वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत केली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनानुसार ही भूमिका मांडण्यात आली. यावेळी पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, नगरसेवक निलेश अल्हाट, महिपाल वाघमारे, श्याम सदाफुले, बसवराज गायकवाड, गोविंद साठे आदी उपस्थित होते. वाडेकर म्हणाले की, अनुसूचित जातींतील विविध घटक सामाजिक हक्कांसाठी अनेक वर्षांपासून एकत्रितपणे संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत घाईघाईने घेतलेल्या निर्णयामुळे समाजातील ऐक्याला तडा जाण्याची शक्यता आहे. जनगणनेतून प्रत्येक जातीची अचूक लोकसंख्या समोर आल्यानंतरच कोणतेही धोरणात्मक निर्णय घेतल्यास सर्व घटकांना न्याय मिळू शकेल.

### एसबीआय लाईफच्या फायनान्शियल ॲडव्हायझरपदी मनीषा लहारे



अहिल्यानगर (आरंभ पर्व) : आर्थिक नियोजन आणि विमा क्षेत्रात ग्राहकांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यरत असलेल्या एसबीआय लाईफ इन्शुरन्समध्ये मनीषा लहारे यांची फायनान्शियल ॲडव्हायझर पदावर निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कष्ट, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर मनीषा लहारे यांनी हे यश संपादन केले आहे. आर्थिक सल्लागार म्हणून त्या ग्राहकांना विमा, बचत, गुंतवणूक आणि आर्थिक नियोजनाबाबत मार्गदर्शन करणार आहेत. या निवडीमुळे त्यांच्या कारकिर्दीत नवे पर्व सुरू झाले असून, त्यांच्या कार्यातून अनेकांना आर्थिक सुरक्षिततेचा मार्ग मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या मेहनतीचे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फळ असल्याची भावना त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केली. मनीषा लहारे यांना या पदासाठी निवड झाल्याबद्दल मित्रपरिवार, नातेवाईक आणि शुभचिंतकांकडून शुभेच्छा देण्यात येत आहेत. त्यांच्या आगामी वाटचालीसाठी उज्ज्वल भवितव्याच्या आणि यशस्वी कारकिर्दीच्या शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत. "आपल्या कार्यातून नव-नवीन यशाची शिखरे सर करीत राहावीत आणि समाजात एक आदर्श आर्थिक सल्लागार म्हणून ओळख निर्माण व्हावी," अशा भावना शुभेच्छुकांनी व्यक्त केल्या. अधिक माहितीसाठी संपर्क : ८७८८९००३१८

### भारती एअरटेलमध्ये राहुल वत्स यांना बढती



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : देशातील आघाडीची दूरसंचार सेवा कंपनी भारती एअरटेलने राहुल वत्स यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये वाढ करत त्यांची समूह मुख्य नियामक अधिकारी आणि कॉर्पोरेट व्यवहार संचालक म्हणून नियुक्ती केली आहे. या नव्या भूमिकेत ते कंपनीच्या कॉर्पोरेट व्यवहार विभागाचे नेतृत्व करणार असून उद्योग क्षेत्र, सरकार आणि नियामक संस्थांशी समन्वय साधण्याची महत्त्वाची जबाबदारी सांभाळणार आहेत. राहुल वत्स हे कंपनीच्या सार्वजनिक धोरणे आणि नियामक धोरणांच्या आखणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. तसेच सरकार आणि विविध नियामक संस्थांशी संवाद साधण्यासाठी ते कंपनीचे प्रमुख प्रतिनिधी म्हणून कार्य करतील. दूरसंचार क्षेत्राबरोबरच इतर व्यवसाय क्षेत्रांतही विस्तार करणाऱ्या एअरटेलने कॉर्पोरेट व्यवहार विभाग अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतल्याचे सांगितले आहे. राहुल वत्स हे यापुढेही एअरटेलच्या व्यवस्थापन मंडळावर कार्यरत राहतील. तसेच त्यांची भारती एअरटेल फाउंडेशनच्या संचालक मंडळावरही नियुक्ती करण्यात येणार आहे. या माध्यमातून फाउंडेशनच्या उपक्रमांना कंपनीच्या व्यापक उद्दिष्टांशी अधिक प्रभावीपणे जोडले जाणार आहे. दूरसंचार क्षेत्रातील जवळपास तीन दशकांचा अनुभव असलेले राहुल वत्स एप्रिल २०२० मध्ये एअरटेलमध्ये मुख्य नियामक अधिकारी म्हणून रुजू झाले होते. त्यांनी भारतीय व्यवस्थापन संस्था, अहमदाबाद तसेच अमेरिकेतील व्हार्टन व्यवस्थापन विद्यालयातून शिक्षण घेतले आहे.




### इसुझूचा देशव्यापी 'आय-केअर प्री-मान्सून सर्व्हिस कॅम्प'

चेन्नई (आरंभ पर्व) : वाहनधारकांना उत्तम सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने इसुझू मोटर्स इंडियाने देशभरात मान्सूनपूर्व वाहन सेवा शिबिर आयोजित करण्याची घोषणा केली आहे. हे विशेष शिबिर १८ ते २४ जून २०२६ या कालावधीत कंपनीच्या सर्व अधिकृत सेवा केंद्रांवर भरविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश वाहनांची मान्सूनपूर्व तपासणी करून सुरक्षित, सुरळीत आणि अडथळामुक्त प्रवास सुनिश्चित करणे हा आहे. शिबिरादरम्यान वाहनांची मोफत ३७ मुद्द्यांवरील सर्वंकष तपासणी करण्यात येणार असून विविध सेवा व सुट्या भागांवर विशेष सवलती देण्यात येणार आहेत. शिबिरात सहभागी होणाऱ्या वाहनधारकांना कामगार शुल्कावर १० टक्के, सुट्या भागांवर ५ टक्के, स्नेहक व इतर द्रव्यांवर ५ टक्के, रस्ते सहाय्य सेवांवर २० टक्के, वाहन देखभाल योजनेवर ५ टक्के तसेच वाढीव हमी योजनेवर २० टक्के सवलत मिळणार आहे. या सवलतींसाठी काही अटी लागू राहतील. अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, लातूर, नागपूर, नाशिक, पुणे, रत्नागिरी, सातारा, सोलापूर, यवतमाळ यांसह देशातील अनेक शहरांतील अधिकृत सेवा केंद्रांवर हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. वाहनधारकांनी आपल्या जवळच्या अधिकृत सेवा केंद्राशी संपर्क साधून आगाऊ नोंदणी करावी, असे आवाहन कंपनीने केले आहे.

# धर्म नावाची गोष्ट शाळेत नको

## शिक्षण हे ज्ञानाचे मंदिर, धर्मप्रचाराचे नव्हे

शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे



**(दै. आरंभ पर्व)**

भारतात धर्म, संस्कृती आणि परंपरा यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि जीवनपद्धती यांचे सहअस्तित्व हेच आपल्या देशाचे वैशिष्ट्य मानले जाते. मात्र, जेव्हा शाळा आणि शिक्षण व्यवस्थेचा विचार केला जातो, तेव्हा एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. शाळेत धर्माचे स्थान असावे का? अनेक शिक्षणतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि संविधान अभ्यासक यांचे मत आहे की, धर्म नावाची गोष्ट शाळेत नको. कारण शाळा ही विद्यार्थ्यांना ज्ञान, विज्ञान, विवेक आणि मानवता शिकवण्याची जागा आहे; कोणत्याही विशिष्ट धर्माची शिकवण देण्याची नव्हे.

शिक्षणाचा मूलभूत उद्देश विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता विकसित करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे आणि समाजात जबाबदार नागरिक घडवणे हा आहे. शाळा ही अशी जागा असावी जिथे प्रत्येक विद्यार्थी धर्म, जात, भाषा किंवा आर्थिक परिस्थिती यांपासून स्वतंत्रपणे समानतेने शिकू शकेल.

जर शाळांमध्ये धर्माला प्राधान्य दिले गेले, तर शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट मागे पडण्याची शक्यता निर्माण होते. विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित, इतिहास आणि समाजशास्त्र शिकवताना तर्कशुद्धता आणि चिकित्सक विचार महत्त्वाचे असतात. धार्मिक शिकवण अनेकदा श्रद्धेवर आधारित असते, तर शिक्षण हे प्रश्न विचारण्यावर आधारित असते.

भारताचे संविधान देशाला धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून ओळख देते. याचा अर्थ राज्य कोणत्याही एका धर्माला प्राधान्य देत नाही. प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचे पालन करण्याचा अधिकार आहे, पण सार्वजनिक संस्थांमध्ये सर्व धर्मांप्रती समान वागणूक राखली जाते.

सरकारी शाळा या सार्वजनिक निधीतून चालतात. त्यामुळे त्या कोणत्याही विशिष्ट धर्माचा प्रचार करणाऱ्या नसून सर्व विद्यार्थ्यांसाठी समान आणि तटस्थ असल्या पाहिजेत. शाळेतील वातावरण धर्मनिरपेक्ष राहिल्यास प्रत्येक विद्यार्थी स्वतःला सुरक्षित आणि स्वीकारलेले समजू शकतो.


लहान वयातील मुले सहजपणे प्रभावाखाली येतात. जर शाळेत विशिष्ट धार्मिक प्रथा, विधी किंवा शिकवण यांना विशेष महत्त्व दिले गेले, तर विद्यार्थ्यांमध्ये "आपण" आणि "ते" असा भेद निर्माण होण्याचा धोका असतो.

भारतासारख्या बहुधार्मिक देशात वर्गखोल्यांमध्ये विविध धर्मांचे विद्यार्थी एकत्र शिकतात. अशा वेळी शाळेने सर्वांना जोडणारी मूल्ये शिकवणे अधिक आवश्यक आहे. धार्मिक ओळखांपेक्षा मानवी मूल्यांना प्राधान्य दिल्यास सामाजिक सलोखा अधिक मजबूत होतो. धर्म शाळेत नसावा, याचा अर्थ नैतिक मूल्ये शिकवू नयेत असा नाही. उलट प्रामाणिकपणा, सहिष्णुता, करुणा, सत्य, अहिंसा, परस्पर आदर आणि सामाजिक जबाबदारी यांसारखी मूल्ये विद्यार्थ्यांना शिकवणे अत्यंत आवश्यक आहे.

ही मूल्ये कोणत्याही एका धर्माची मक्तेदारी नसून सार्वत्रिक मानवी मूल्ये आहेत. शाळांनी धर्माऐवजी मूल्यशिक्षणावर भर दिल्यास विद्यार्थ्यांमध्ये व्यापक मानवतावादी दृष्टिकोन विकसित होऊ शकतो. शाळेत धर्माचा प्रचार नसावा, पण विविध धर्मांविषयी वस्तुनिष्ठ माहिती देणे आवश्यक असू शकते. इतिहास किंवा समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमात जगातील प्रमुख धर्मांची उत्पत्ती, त्यांचे सामाजिक परिणाम आणि सांस्कृतिक योगदान यांचा अभ्यास विद्यार्थ्यांना समाज समजून घेण्यासाठी मदत करतो. मात्र हा अभ्यास माहितीपर असावा; कोणत्याही धर्माचे श्रेष्ठत्व सिद्ध करणारा नसावा. विद्यार्थ्यांना विविधतेचा आदर शिकवणे हे धर्मशिक्षणापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. आधुनिक जगात विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवकल्पना यांना मोठे महत्त्व आहे. विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन, पुराव्यावर आधारित विचार आणि समस्यांचे तर्कशुद्ध निराकरण करण्याची क्षमता विकसित करणे गरजेचे आहे. धर्म हा वैयक्तिक श्रद्धेचा विषय असू शकतो, पण शिक्षणाचा पाया वैज्ञानिक विचारसरणीवर उभा असणे आवश्यक आहे. म्हणूनच शाळेचे केंद्रबिंदू विज्ञान, ज्ञान आणि विवेक असले पाहिजेत.

धार्मिक संस्कार, श्रद्धा आणि परंपरा यांचे शिक्षण कुटुंब, समाज आणि धार्मिक संस्थांमार्फत दिले जाऊ शकते. प्रत्येक कुटुंबाला आपल्या मुलांना त्यांच्या श्रद्धेनुसार संस्कार देण्याचा अधिकार आहे. मात्र शाळेची भूमिका सर्वांना समान शिक्षण देण्याची आहे.

शाळा ही धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक राहिल्यास विद्यार्थ्यांना विविधतेत एकता, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक सौहार्द यांचे धडे अधिक प्रभावीपणे मिळू शकतात. धर्म हा व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्याचा आणि श्रद्धेचा विषय आहे, तर शाळा ही ज्ञान, विवेक आणि समानतेची जागा आहे. त्यामुळे शाळांमध्ये कोणत्याही प्रकारचा धर्मप्रचार किंवा धार्मिक पक्षपात असू नये. त्याऐवजी मानवी मूल्ये, वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक तत्त्वे आणि सामाजिक सलोखा यांवर आधारित शिक्षण दिले गेले पाहिजे. शाळा धर्म शिकवणारी नव्हे, तर विचार करायला शिकवणारी असावी. कारण उद्याचा सशक्त, विवेकी आणि समतावादी समाज घडवण्याची ताकद शिक्षणात आहे, धर्मप्रचारात नाही.




### ड्रीमेने भारतात सादर केले दोन प्रीमियम रोबोटिक व्हॅक्यूम क्लीनर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्मार्ट गृहउपकरण क्षेत्रातील अग्रगण्य ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतात एल५०एस प्रो अल्ट्रा आणि एल५० अल्ट्रा सीई हे दोन प्रीमियम रोबोटिक व्हॅक्यूम क्लीनर सादर केले आहेत. अत्याधुनिक सक्शन तंत्रज्ञान, बुद्धिमान मार्गदर्शन प्रणाली, अडथळे ओळखण्याची क्षमता, कोपरे व कडा स्वच्छ करण्याची सुविधा आणि गालिच्यांसाठी विशेष स्वच्छता उपाय अशी वैशिष्ट्ये या उपकरणांमध्ये आहेत.

तसेच नकाशा तयार करणे, मोबाईलद्वारे नियंत्रण आणि ध्वनी सहाय्यकांशी सुसंगतता यांचाही समावेश आहे. ही उत्पादने १६ जूनपासून ॲमेझॉन इंडिया, ड्रीमेची भारतीय संकेतस्थळ, क्रोमा आणि निवडक विक्री केंद्रांवर उपलब्ध असून त्यांची किंमत अनुक्रमे ७९,९९९ रुपये आणि ६४,९९९ रुपये आहे.

## कै. इंदूमती रामचंद्र दळवी शाळेत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत





**धायरी (दै. आरंभ पर्व)**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त प्रभाग क्रमांक ३४ मधील धायरी दळवीवाडी परिसरातील कै. इंदूमती रामचंद्र दळवी शाळेत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा स्वागत समारंभ पार पडला. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे औक्षण व पूजन करून त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन त्यांचे तोंड गोड करण्यात आले. शासनामार्फत उपलब्ध होणाऱ्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटपही यावेळी करण्यात आले. नवीन पुस्तके हातात मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांनी सुंदर आणि नियोजनबद्ध स्वागत समारंभाचे आयोजन केले होते. कार्यक्रमास श्री. विलासजी पोकळे, उद्योजक इंद्रजीत दळवी, श्री. सूर्यकांतजी बाठे, श्री. किसनजी गायकवाड तसेच मुख्याध्यापक अनिल लोळे व सर्व शिक्षक, पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत नियमित शिक्षण, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व सांगितले.

> "शाळेचा पहिला दिवस हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील नव्या स्वप्नांची आणि नव्या आशांची सुरुवात असतो. या नव्या शैक्षणिक वर्षात सर्व विद्यार्थ्यांनी यशाची नवी शिखरे गाठावीत,"
> **- राजाभाऊ लायगुडे, नगरसेवक पुणे मनपा**

# येरवडा खुले कारागृहात प्रासादिक कीर्तन सोहळा

## संत विचारांनी बंदी झाले मंत्रमुग्ध : कीर्तनातून बंद्यांच्या मनपरिवर्तनाचा संदेश



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कारागृहातील बंद्यांच्या मानसिक परिवर्तनासह त्यांच्या पुनर्वसनाला चालना देण्याच्या उद्देशाने येरवडा खुले जिल्हा कारागृहात सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि वै. मामासाहेब दांडेकर वारकरी सेवा संघ, आळंदी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य प्रासादिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास बंद्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कारागृह विभागाच्या 'सुधारणा व पुनर्वसन' या ब्रीदवाक्यानुसार बंद्यांमध्ये सकारात्मक विचार रुजावेत आणि त्यांचे सामाजिक पुनर्स्थापन सुलभ व्हावे यासाठी विविध सांस्कृतिक, सामाजिक, प्रबोधनात्मक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून क्रांतिकारक कीर्तनकार ह.भ.प. निलेश महाराज झरेगावकर यांचे प्रासादिक कीर्तन आयोजित करण्यात आले.

आपल्या ओघवत्या आणि रसाळ वाणीतून निलेश महाराजांनी संत परंपरा, भगवान श्रीकृष्ण, प्रभू श्रीराम, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज तसेच वाल्मिकी ऋषी यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचा दाखला देत मानवी जीवनाचे महत्त्व, चुका सुधारण्याची संधी आणि सद्गुणांचा अंगीकार करण्याची गरज याविषयी मार्गदर्शन केले. कीर्तनादरम्यान ज्ञानोबा-तुकारामांच्या गजराने संपूर्ण कारागृह परिसर दुमदुमून गेला आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओव्यांचा उल्लेख करत कीर्तनाच्या संदेशाचे सार मांडले. कारागृहातील बंद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी अशा अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात सुमारे १५० बंद्यांनी सहभाग नोंदविला. हा उपक्रम अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य डॉ. सुहास वारके यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे यांच्यासह कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि बंदी बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

## खासदारांविरोधात घरासमोर आंदोलनाचा काँग्रेसचा इशारा : गोपाळदादा तिवारी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इंडिया आघाडीच्या तिकिटावर निवडून आलेले खासदार सत्ताधारी पक्षात प्रवेश करत असतील, तर तो मतदारांच्या जनादेशाशी विश्वासघात असल्याचा आरोप करत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी अशा खासदारांच्या घरांसमोर तीव्र निषेध आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात तिवारी यांनी म्हटले आहे की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत जनतेने संविधानाचे संरक्षण, लोकशाही मूल्यांचे जतन आणि केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात स्पष्ट जनादेश दिला होता. या पार्श्वभूमीवर विरोधी आघाडीच्या पाठिंब्यावर निवडून आलेले खासदार पक्षांतर करत असतील, तर ते मतदारांचा विश्वासघात करणारे कृत्य ठरेल. तिवारी यांनी दावा केला की, लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या खासदारसंख्येत लक्षणीय वाढ झाली असून देशातील जनतेने सशक्त विरोधी पक्षाला पाठिंबा दिला आहे. दुसरीकडे, भाजपला अपेक्षित यश मिळाले नसून केंद्रातील सरकार हे मित्रपक्षांच्या पाठिंब्यावर सत्तेत असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील संभाव्य पक्षांतराच्या चर्चांवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, इंडिया आघाडीतील उमेदवारांना निवडून आणण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेतले आहेत. त्यामुळे जनतेच्या कौलाच्या विरोधात जाऊन पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींविरोधात काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरतील.

# आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाचे 'झॅगनेलीस प्रोटेक्ट' सादर




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाने वाहन उद्योगासाठी विकसित करण्यात आलेल्या 'झॅगनेलीस प्रोटेक्ट' या अत्याधुनिक संरक्षक-लेपित पोलाद उत्पादनाची घोषणा केली आहे. युरोपमध्ये यशस्वी ठरलेले हे पेटंट प्राप्त तंत्रज्ञान आता प्रथमच भारतात उपलब्ध झाले असून, अशा प्रकारचे उच्च दर्जाचे पोलाद आतापर्यंत पूर्णपणे आयात केले जात होते. झिंक, ॲल्युमिनियम आणि मॅग्नेशियमच्या विशेष संरक्षक लेपाने तयार केलेले हे प्रीमियम पोलाद वाहन उद्योगातील महत्त्वाच्या भागांसाठी वापरण्यात येणार आहे. या उत्पादनामुळे वाहन उत्पादकांना कमी कालावधीत पुरवठा, सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि विश्वासार्ह उपलब्धतेचा लाभ मिळणार आहे.

या नव्या उत्पादनाचा प्रारंभिक वापर वाहनांमधील खिडक्या, आरसे, वायपर आणि आसन यंत्रणांमध्ये वापरल्या जाणाऱ्या विद्युत मोटारींच्या संरक्षण कवचासाठी केला जाणार आहे. प्रत्येक वाहनात अशा अनेक मोटारींचा वापर होत असल्याने या उत्पादनाचा त्वरित लाभ वाहन उद्योगाला मिळणार आहे. सध्या देशातील वाहन उद्योगात वापरल्या जाणाऱ्या काही विशेष पोलाद प्रकारांपैकी सुमारे ८ ते १० टक्के पोलाद आयात केले जाते. भारतात दरवर्षी ३ कोटींपेक्षा अधिक वाहने तयार होत असून, गंजरोधक आणि वजनाने हलक्या साहित्याची मागणी सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत देशातच या दर्जाचे उत्पादन उपलब्ध होणे वाहन उद्योगासाठी महत्त्वाचे मानले जात आहे. कंपनीचे विक्री व विपणन विभागाचे संचालक आणि उपाध्यक्ष रंजन धर यांनी सांगितले की, या उत्पादनामुळे भारतातील वाहन उद्योगाला जागतिक दर्जाचे साहित्य देशांतर्गत उपलब्ध होणार आहे. तसेच आयातीवरील अवलंबित्व कमी होऊन 'आत्मनिर्भर भारत' अभियानाला बळ मिळेल. झॅगनेलीस प्रोटेक्ट हे पारंपरिक संरक्षक-लेपित पोलादापेक्षा अधिक गंजरोधक मानले जाते. विशेषतः कापलेल्या कडा, जोड भाग आणि आकार दिलेल्या घटकांमध्ये हे अधिक संरक्षण देते. तसेच स्वतःहून गंज रोखण्याची क्षमता, उत्कृष्ट आकारक्षमतेसह दीर्घकालीन टिकाऊपणा हे या उत्पादनाचे वैशिष्ट्य आहे. मोटार संरक्षण कवचांव्यतिरिक्त वाहनांच्या तळरचनेतील भाग, दरवाज्यांचे आतील भाग, इंजिन आच्छादनाचे आतील भाग तसेच मागील झाकणाच्या आतील भागांसाठीही या उत्पादनाचा वापर करता येणार आहे.

*पुण्याचे डॉ. संकेत खरपुडे यांची मालावी प्रजासत्ताकाच्या*

# ‘ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशनर’ पदी नियुक्ती



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारत आणि मालावी प्रजासत्ताक (Republic of Malawi) या दोन्ही देशांमधील व्यावसायिक व आर्थिक संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. भारतामधील मालावीचे महामहीम उच्चायुक्त (High Commissioner) श्री. लिओनार्ड मेंगेझी यांनी डॉ. संकेत खरपुडे यांची पुणे (महाराष्ट्र, भारत) क्षेत्रासाठी मालावीचे ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशनर (TIC - व्यापार आणि गुंतवणूक आयुक्त) म्हणून अधिकृत नियुक्ती केली आहे. व्यापार आणि गुंतवणूक आयुक्त (Trade and Investment Commissioner) हे एक अत्यंत जबाबदारीचे आणि राजनैतिक स्तरावरचे महत्त्वाचे पद आहे. या पदाचा मुख्य उद्देश दोन देशांमधील द्विपक्षीय व्यापाराला चालना देणे हा असतो. डॉ. खरपुडे यांच्यावर प्रामुख्याने खालील जबाबदाऱ्या असतील:

गुंतवणुकीला चालना: पुणे आणि महाराष्ट्रातील प्रमुख उद्योजकांना मालावी देशातील गुंतवणुकीच्या संधींची ओळख करून देणे. व्यापार विस्तार: कृषी, तंत्रज्ञान, शिक्षण आणि उत्पादन क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये आयात-निर्यात वाढवणे. बिझनेस नेटवर्किंग: भारत आणि मालावीच्या व्यावसायिक समुदायांमध्ये एक भक्कम दुवा (Brid g e ) म्हणून काम करणे. पुणे हे भारताचे एक मोठे औद्योगिक आणि शैक्षणिक केंद्र असल्याने , डॉ. खरपुडे यांच्या या नियुक्तीमुळे स्थानिक उद्योगांना आफ्रिकन बाजारपेठेत, विशेषतः मालावीमध्ये आपला व्यवसाय विस्तारण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. या महत्त्वपूर्ण नियुक्तीबद्दल डॉ. संकेत खरपुडे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





# ओबीसी समाजाच्या सक्षमीकरणासाठी संघटन बळकट करण्याचा निर्धार

## पश्चिम महाराष्ट्र ओबीसी मोर्चा बैठक संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा पश्चिम महाराष्ट्राची महत्त्वपूर्ण बैठक पुणे येथील घरकुल लॉन्स, डीपी रोड येथे उत्साहपूर्ण आणि संघटनात्मक वातावरणात संपन्न झाली. भाजप ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ. योगेश टिळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्यातील भाजप-महायुती सरकारने राबविलेल्या विविध योजनांचा आणि उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत ओबीसी समाजाची अस्मिता जपणे, समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पक्षाची भूमिका आणि शासनाच्या योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी “ओबीसी संवाद अभियान” प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच महिला, युवा आणि विविध सामाजिक घटकांना संघटनामध्ये अधिकाधिक संधी देऊन पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त तसेच क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्त महायुती सरकार विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबवत असून समाजातील वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या बैठकीस भारतीय जनता पार्टीचे महामंत्री राजेश पांडे, जिल्हाध्यक्ष शेखर ढवणे, नगरसेविका जयश्री भूमकर, धनश्री कोल्हे , डॉ. दादा कोद्रे, किशोर धायरकर, माजी महापौर संगीता खोत, उज्वला हाके, पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख सचिन लंबाते, मनोज ब्राह्मणकर, प्रदेश ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, पुणे शहर ओबीसी मोर्चा अध्यक्ष विकास लवटे, ओबीसी मोर्चा सरचिटणीस रमेशबापू गायकवाड, चेतन भुजबळ, नवनाथ भुजबळ, गजानन वाकसे यांच्यासह पश्चिम महाराष्ट्रातील प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, मंडल अध्यक्ष आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत आगामी काळात ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करत संघटन विस्तार आणि जनसंपर्क अभियान अधिक व्यापक करण्याचा निर्धार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन लंबाते यांनी तर आभार प्रदर्शन दत्ताभाऊ कोल्हे यांनी केले. यावेळी आमदार योगेश टिळेकर म्हणाले, "ओबीसी समाज हा देशाच्या विकासाचा कणा आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचविणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे ही भाजपची बांधिलकी आहे. 'ओबीसी संवाद अभियान' हे केवळ अभियान नसून समाजाशी नाळ जोडणारे एक प्रभावी माध्यम आहे. संघटन अधिक सक्षम करून ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी आणि विकासासाठी आम्ही सातत्याने कार्यरत राहणार आहोत."

## थोडक्यात पण महत्वाचे

### नैसर्गिक तेजासाठी त्वचेला आवश्यक असलेले पोषक घटक




पुणे (आरंभ पर्व) : कोणत्याही सौंदर्य विभागातून फिरताना तुम्हाला इन्स्टंट ग्लोचे आश्वासन देणारे सिरम्स, फेस मास्क्स आणि ओव्हरनाईट क्रीम्स यांची भरमार दिसते. मात्र, कोणताही क्लिनिकल न्यूट्रिशनिस्ट सांगेल की त्वचा ही केवळ शरीरात आत काय घडते याचे प्रतिबिंब असते. खराब आहाराला केवळ स्किनकेअरने संतुलित करता येत नाही. जेव्हा शरीराला आवश्यक सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता भासते, तेव्हा त्याचे परिणाम थेट चेहऱ्यावर दिसतात—निस्तेजपणा, कोरडेपणा किंवा लवकर येणाऱ्या सूक्ष्म सुरकुत्यांच्या स्वरूपात. रात्री चेहरा धुतल्यावरही नाहीशी न होणारी, नैसर्गिक आणि चिरकाल टिकणारी त्वचा-कांती मिळवण्यात तुम्हाला मदत करण्यासाठी, 'मॅक्स हेल्थकेअर'च्या आहारशास्त्र विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समाद्दार अशा सहा मूलभूत पोषक घटकांची माहिती देत आहेत, जे तुमच्या त्वचेला अगदी पेशींच्या पातळीपासून पोषण देतात: व्हिटॅमिन ई: व्हिटॅमिन ई हे एक फॅट-सोल्युबल अँटीऑक्सिडंट आहे. हे प्रदूषण आणि UV (अल्ट्राव्हायोलेट) एक्सपोजरमुळे होणाऱ्या ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून त्वचेच्या पेशींचे संरक्षण करते. हे पेशी पातळीवर ओलावा टिकवून ठेवण्याचे काम करते, ज्यामुळे त्वचा भरदार (plump) आणि लवचिक (resilient) राहते. कॅलिफोर्निया बदाम हे आहारातील व्हिटॅमिन ईचे सर्वात समृद्ध स्रोत आहेत, आणि काही बदाम रोजच्या गरजेचा मोठा भाग पूर्ण करतात, तेही शरीर चांगल्या प्रकारे शोषू शकणाऱ्या स्वरूपात. हे सवयीत आणण्याचा एक सोपा मार्ग म्हणजे त्यांना तुमच्या सकाळच्या स्मूदीमध्ये टाकणे किंवा घराबाहेर जाण्यापूर्वी तुमच्या सिरीयलवर भुरभुरवणे.

### प्रिझमने पुणे ट्रॅव्हल पार्टनर्सच्या सहकार्याने नेटवर्क केले मजबूत



पुणे (आरंभ पर्व) : ओयोची मूळ कॉर्पोरेट कंपनी, प्रिझमने, पश्चिम भारतातील आपल्या विस्तार कार्यक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी पुणे येथे भव्य ट्रॅव्हल पार्टनर मीट आयोजित केली. या कार्यक्रमात प्रदेशातील 150 हून अधिक आघाडीच्या ट्रॅव्हल एजंट्स आणि पर्यटन उद्योगातील भागीदारांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमात प्रिझम ने आपल्या ग्राहकाभिमुख विविध ब्रँड्स आणि सेवांचे सादरीकरण केले. यामध्ये संडे, क्लबहाऊस, पॅलेट, टाऊनहाऊस आणि डॅनसेंटर या ब्रँड्सचा समावेश होता. राज्यभरातील ट्रॅव्हल एजंट्सनी PRISM च्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधून हॉस्पिटॅलिटी क्षेत्राविषयी माहिती मिळवली तसेच भारत आणि जागतिक स्तरावरील व्यावसायिक संधींचा आढावा घेतला. या सत्रात प्रिझम च्या विविध व्यवसायांमधील वाढीच्या संधींवरही विशेष प्रकाश टाकण्यात आला. यामध्ये चेकइन हॉटेल्स, इनोव्हेट आणि चेकइन व्हॅकेशन्स या व्यवसायांचा समावेश होता. ट्रॅव्हल भागीदारांनी हॉटेल रूम बुकिंग, हॉलिडे पॅकेजेस, लाँग-स्टे अ‍ॅकॉमोडेशन, कॉर्पोरेट प्रवासाच्या गरजा तसेच फ्लेक्सिबल वर्कस्पेस पार्टनरशिप यांसारख्या विविध क्षेत्रांतील सहकार्याच्या संधींचा आढावा घेतला.

### नव्या संकल्पांसह खेड तालुक्यात जिल्हा परिषद शाळांची घंटा वाजली



राजगुरूनगर (आरंभ पर्व) : उन्हाळी सुट्टीनंतर खेड तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी शाळा सोमवारी १५ जूनपासून नव्या उत्साहात सुरू झाल्या. शाळेच्या पहिल्याच दिवशी नव्याने प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांचे औक्षण, पुष्पवृष्टी आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून जल्लोषात स्वागत करण्यात आले. राजगुरूनगर मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रवेशोत्सवामुळे शाळा परिसर आनंद, उत्साह आणि विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने फुलून गेला होता. राजगुरूनगर शहराचे नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ येथे विद्यार्थ्यांचे स्वागत करून प्रवेशोत्सवात सहभाग घेतला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सुदृढ आरोग्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## श्रीराम फार्म सोल्युशन्सने पीक पोषण उत्पादने केली सादर

**छ. संभाजीनगर (दै. आरंभ पर्व)**



डीसीएम श्रीराम लिमिटेडचा एक विभाग असलेल्या श्रीराम फार्म सोल्युशन्सने आपली अत्याधुनिक पीक संरक्षण, विशेष वनस्पती पोषण (स्पेशालिटी प्लांट न्यूट्रिशन) तसेच संशोधनाधारित बियाणे उत्पादने बाजारात सादर केली. आपला पीक संरक्षण उत्पादन पोर्टफोलिओ अधिक बळकट करण्यासाठी कंपनीने श्रीराम सेनकुशा, श्रीराम एडेलॉन आणि श्रीराम झारविन ही तीन नवीन उत्पादने सादर केली. भारतीय शेतकऱ्यांपर्यंत जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान पोहोचविण्याच्या श्रीरामच्या वचनबद्धतेचे हे द्योतक आहे. ही प्रभावी उत्पादने जागतिक नवोन्मेषकांच्या पेटंटप्राप्त तंत्रज्ञानाच्या आधारे काळजीपूर्वक विकसित करण्यात आली असून, आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या पिकांमध्ये आढळणाऱ्या कीड, किडी व रोगांपासून प्रभावी संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आली आहेत. श्रीराम सेनकुशा हे जपानी तंत्रज्ञानावर आधारित नाविन्यपूर्ण उत्पादन असून, उच्च मूल्याच्या शेतपिके व फलोत्पादन पिकांमधील प्रमुख लेपिडॉप्टेरन अळ्या तसेच थ्रिप्सच्या प्रभावी नियंत्रणासाठी विकसित करण्यात आले आहे.

## घाटघर शाळेत प्रवेशोत्सव व शिष्यवृत्तीधारकांचा गौरव

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर तालुक्याच्या अतिदुर्गम आदिवासी भागातील घाटघर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव,नवागतांचे स्वागत तसेच इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार अशा विविध उपक्रमांनी नव्या शैक्षणिक वर्षाची उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात करण्यात आली.

यंदाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील सात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. जुई विष्णु शिंदे (२०२ गुण), तेजल बाळू मुकणे (१९२), अनुष्का बाळू पानसरे (१६२), आराध्या पांडुरंग शिंगाडे (१५४), ईश्वरी मीनानाथ घुटे (१५४), नंदा बाळू शिंगाडे (१४८) आणि ओंकार शरद



वाळकोळी (१२८) या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी केंद्रप्रमुख वामन दादू शेळके, मुख्याध्यापिका पुष्पलता उकिरडे, भरत घोटकर तसेच शिष्यवृत्ती मार्गदर्शक प्रशांत लोखंडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक मुकणे, माजी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय शिंदे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विष्णू रावते, माजी विद्यार्थी संघाचे सदस्य गणेश लोखंडे, माजी पेसा अध्यक्ष अनिल रावते, तसेच वंदना रावते, डिंपल आढारी, राहुल लोखंडे, सुशीला पानसरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सामाजिक घटकांचे सहकार्यही लाभत आहे. संदीप बिबवे (पुणे) यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे या उद्देशाने वर्षभरासाठी फुटाण्याची व्यवस्था करण्यात आली असून, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या पोषणासाठी मोलाचा ठरत आहे. तसेच पालवी ग्रुपच्या माध्यमातून जितेंद्र गायकर यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना सुमारे दहा हजार रुपयांच्या मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. प्रवेशोत्सव, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि समाजातील दात्यांच्या सहकार्यामुळे घाटघर शाळेतील शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध होत असून, या उपक्रमांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## प्रभाग ३३ मधील पाणीटंचाईचा प्रश्न मुख्य सभेत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३३ मधील शिवणे, खडकवासला, किरकटवाडी, कोंढवे, कोपरे, उत्तमनगर, नांदोशी, धायरी आणि नांदेड या परिसरांमध्ये निर्माण झालेल्या गंभीर पाणी समस्येचा मुद्दा नगरसेवक सुभाषभाऊ नाणेकर यांनी पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेत उपस्थित करून प्रशासनाचे लक्ष वेधले.



### सुभाषभाऊ नाणेकर यांची प्रशासनाकडे जोरदार मागणी

यावेळी बोलताना नाणेकर यांनी सांगितले की, प्रभाग ३३ मधील नागरिकांना अनेक दिवसांपासून अपुरा व अनियमित पाणीपुरवठा सहन करावा लागत आहे. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट होऊनही या भागात अद्याप शहरी भागांप्रमाणे सक्षम पाणीपुरवठा व्यवस्था कार्यान्वित झालेली नाही. त्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर किमान दररोज सलग तीन तास सुरळीत पाणीपुरवठा करण्यात यावा, तसेच या भागासाठी स्वतंत्र आणि दीर्घकालीन पाणीपुरवठा योजना तातडीने तयार करून कार्यान्वित करण्यात यावी, अशी मागणी नाणेकर यांनी सभागृहात केली.

याशिवाय पाणीपुरवठा विभागासाठी पूर्णवेळ अधिकारी व अभियंता नियुक्त करून नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्याची मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली.

या विषयाची गांभीर्याने दखल घेत महापौर मंजुषा नागपुरे यांनी संबंधित विभागास आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देत सकारात्मक भूमिका घेतली.

पाणीपुरवठा विभागाचे अभियंता नंदकिशोर जगताप यांनी याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. यामुळे प्रभाग ३३ मधील नागरिकांना लवकरच दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण जातीय जनगणनेनंतरच करावे : उपमहापौर परशुराम वाडेकर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करणे हे समाजात अंतर्गत फूट निर्माण करणारे ठरू शकते. त्यामुळे पक्षाचा त्याला प्राथमिक विरोध आहे. मात्र, उपवर्गीकरण करायचेच असल्यास ते लोकसंख्येच्या अचूक प्रमाणावर आधारित असावे आणि राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण झाल्यानंतरच त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी पुण्याचे उपमहापौर तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे नेते परशुराम वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत केली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनानुसार ही भूमिका मांडण्यात आली. यावेळी पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, नगरसेवक निलेश अल्हाट, महिपाल वाघमारे, श्याम सदाफुले, बसवराज गायकवाड, गोविंद साठे आदी उपस्थित होते.

## ऑपरेशन थिएटर, सोनोग्राफी व डायलिसिस सेंटर निर्मिती करा : सचिन मोरे

### मुख्य सभेत आरोग्यविषयक चर्चेमध्ये मांडला विषय जगताप यांची मुख्य सभेत मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड परिसरातील नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आज पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेत नगरसेवक सचिन मोरे यांनी महत्त्वाची मागणी केली. सिंहगड रोड येथील लायगुडे हॉस्पिटल येथे अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, सोनोग्राफी सेंटर तसेच डायलिसिस सेंटर सुरू करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली. सिंहगड रोड परिसरात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वाढत असून विविध आरोग्य सुविधांची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः डायलिसिस रुग्णांना उपचारांसाठी शहराच्या इतर भागात जावे लागते. तसेच सोनोग्राफी व शस्त्रक्रियांसाठीही नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर लायगुडे हॉस्पिटलमध्ये आवश्यक



सुविधा उपलब्ध करून दिल्यास परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे सचिन मोरे यांनी सभागृहात नमूद केले. प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरात निर्णय घ्यावा अशी सूचना महापौर मंजुषा नागपुरे यांनी संबंधित विभागाला केली. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा असून सिंहगड रोड परिसरातील अनेक नागरिकांना याचा फायदा होणार आहे.

## पानशेत धरणावरून पुण्याला पाणीपुरवठा करण्याची योजना राबवावी

### अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांची मुख्य सभेत मागणी





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहराची दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या आणि पाण्याची वाढती गरज लक्षात घेता खडकवासला धरण साखळीव्यतिरिक्त पर्यायी जलस्रोतांचा विचार करणे आवश्यक असल्याचे मत माजी उपमहापौर नगरसेवक अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांनी पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेत व्यक्त केले. सध्या पुणे शहराला खडकवासला धरण साखळीतून पाणीपुरवठा केला जातो. मात्र भविष्यातील वाढत्या गरजा लक्षात घेऊन पानशेत धरणावरून स्वतंत्र पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करून ती प्रत्यक्षात आणल्यास पुणे महानगरपालिकेला मोठा फायदा होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी बोलताना अ‍ॅड.जगताप म्हणाले की, "पानशेत धरणावरील पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाल्यास पुणे शहरातील पाण्यावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल. भविष्यात शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची वेळ येणार नाही आणि नागरिकांना अधिक शाश्वत व नियमित पाणीपुरवठा करता येईल." विशेष म्हणजे, अ‍ॅड.जगताप यांनी यापूर्वीही हा विषय प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. मात्र शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन त्यांनी पुन्हा एकदा मुख्य सभेत हा मुद्दा ठामपणे मांडला. पुणेकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दीर्घकालीन स्वरूपात सोडवण्यासाठी आणि शहराच्या भविष्यातील जलसुरक्षेच्या दृष्टीने हा अत्यंत रास्त व महत्त्वाचा विषय असल्याची भावना सभागृहात व्यक्त करण्यात आली. जगताप यांनी मांडलेल्या या प्रस्तावामुळे भविष्यात पुणेकरांची तहान भागविण्यास मोठी मदत होणार आहे.